पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

• वर्ष १६ • अंक ६८ • रविवार, दि. १३सप्टेंबर २०२६ • मूल्य ५ • पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 · Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 · Web. https://epaper.citynewssuperfast.com


**सुविचार**

श्रीमंती विचारांची
असायला हवी,पैसा काय
भिकारीही कमावतो


सिटी न्यूज सुपरफास्ट
रिसोड तालुका
अंक मिळण्यासाठी व जाहिरातींसाठी
संपर्क
प्रभाकर नाईकवाडे
तालुका प्रतिनिधी
+91 7218114784


## »थोडक्यात

### आज महिला आशिया कप फायनल!

**मुंबई :** आशिया कप टी-२० क्रिकेट भारत आणि श्रीलंका संघ रविवारी महिलांच्या आशिया कप टी-२० क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम लढतीत आमनेसामने येत असून, गतपराभवाचे उट्टे काढून भारतीय संघ आठव्यांदा ही स्पर्धा जिंकणार का, याबाबत उत्सुकता शिगेला पोचली आहे. गेल्या अर्थात २०२४मध्ये झालेल्या आशिया कपमध्ये या संघांतच जेतेपदाची लढत झाली होती. डम्बुलात झालेल्या त्या लढतीत श्रीलंकेने बाजी मारली होती. या वेळीही हेच संघ आमनेसामने आहेत. साहजिकच गतपराभवाचे उट्टे काढून पुन्हा एकदा जेतेपदाला गवसणी घालण्यासाठी भारतीय संघ उत्सुक आहे.

---

### बाप्पाच्या आगमनापूर्वी मुंबईत धो-धो पाऊस!

**मुंबई :** लाडक्या गणपती बाप्पाच्या आगमनासाठी आता अवघे काही तास शिल्लक राहिले असताना त्यापूर्वी मुंबई, उपनगर, ठाणे आणि कल्याण, डोंबिवली परिसरात पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. मुंबईमध्ये मोठ्या विश्रांतीनंतर पुन्हा एकदा पावसाला दणक्यात सुरुवात झाली आहे. उद्या गणपती बाप्पाचं आगमन होणार असताना, त्याआधीच मुंबईत पावसाचं आगमन झालं आहे. मध्यरात्रीपासून मुंबईच्या अनेक भागांत पावसाच्या सरी बरसताना पाहायला मिळत आहेत. त्यामुळे गणेशोत्सवाच्या तयारीवरही पावसाचा परिणाम होण्याची शक्यता आहे. आज मुंबईकर बाप्पाच्या आगमनाच्या तयारीसाठी बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी गर्दी करतील. मात्र, मुसळधार पावसामुळे मुंबईकरांची खरेदी करताना तारांबळ उडण्याची शक्यता आहे.

---

### जरांगे पाटलांनी मुंबई पोलिसांना उपोषणाची परवानगी मागितली!

**मुंबई :** मराठा आरक्षणाच्या मागण्यांसाठी अंतरवाली सराटी येथे उपोषणाला बसलेले मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुंबई पोलिसांना एक पत्र पाठवले आहे. या पत्रात त्यांनी मुंबईतील आंदोलनासंदर्भात परवानगीची मागणी केली आहे. १९ सप्टेंबर रोजी मनोज जारांगे पाटील यांना आझाद मैदानात आंदोलन करण्यासंदर्भात परवानगीसाठी पोलीस आयुक्तांना हे पत्र पाठवण्यात आले आहे. मात्र, मुंबई पोलिसांनी या पत्रावर अद्याप कोणतेही उत्तर दिलेले नाही. मनोज जरांगे पाटील १५ सप्टेंबरला अंतरवाली सराटीवरून मुंबईच्या दिशेने कूच करतील. त्यानंतर ते पाटोदा, अहिल्यानगर, हडपसर, खोपोली, कोपरखैरणेमार्गे १९ सप्टेंबरला मुंबईत दाखल होतील.

---

बाप्पांच्या आगमनाची चाहूल

# शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित

## पावसाच्या दमदार हजेरीने सोयाबीन व कापूस उत्पादकांना दिलासा

प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**अकोला :** गणेशोत्सवाच्या तोंडावर आणि बाप्पांच्या आगमनाची चाहूल लागलेली असतानाच, गेल्या अनेक दिवसांपासून पावसाची आस लावून बसलेल्या अकोलेकरांना आणि बळीराजाला आज निसर्गाने मोठा दिलासा दिला. आज सोमवारी सकाळी अकोला शहर आणि परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे चिंतेच्या ढगांमध्ये अडकलेल्या हजारो शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा एकदा हास्य उमलले आहे.

हवामान खात्याने आजच्या पावसासोबतच उद्याही जिल्ह्यात पावसाचे आगमन आणि जोर कायम राहण्याचा अंदाज वर्तवला आहे. जर पुढील दोन दिवस असाच पाऊस कायम राहिला, तर जमिनीत पुरेसा ओलावा टिकून राहील. त्यामुळे पिकांची उत्पादकता टिकून राहण्यास मदत होईल.जरी आजच्या पावसामुळे शेतकऱ्यांची निराशा दूर होऊन आशा पल्लवीत झाली असली, तरी पिकांची पूर्ण गरज भागवण्यासाठी आणि विहिरी तसेच भूजल पातळी वाढण्यासाठी अद्यापही अधिक पावसाची गरज प्रत्येक जण व्यक्त करत आहे.





### सुकत चाललेल्या पिकांना मिळाले नवसंजीवनी

गेल्या काही आठवड्यांपासून पावसाने ओढ दिल्यामुळे विदर्भातील तसेच अकोल्यातील शेतकरी अत्यंत बिकट आणि निराशजनक परिस्थितीतून जात होते. या महत्त्वाच्या टप्प्यावर विहिरींचे पाणी आटू लागले होते आणि शेतातील उभी पिके सुकण्याच्या मार्गावर होती.या काळात सोयाबीन आणि कापूस ही दोन्ही मुख्य पिके सध्या फुलावर (बहरात) आली आहेत. अशा नाजूक स्थितीत पाऊस पडणे अत्यंत आवश्यक होते. आज पडलेल्या दमदार पावसामुळे या दोन्ही पिकांना मोठी मदत होणार असून, ती करपण्यापासून तरतील. शेतातील पिकांना जणू संजीवनीच मिळाली आहे.

### पाण्याचा अपव्यय केल्यास पाच ते हजार दंडाची तयारी

पाण्याचा अपव्यय केल्यास महापालिका दंडाची पावती फाडणार आहे. काही अकोलेकर गाडी धुण्यासाठी, रस्त्यावर पाणी टाकण्यासाठी पाण्याचा अपव्यय करत आहे. टंचाईची परिस्थिती पाहता अशा प्रकारे पाण्याचा अपव्यय सहन केला जाणार नाही. महापालिका थेट अशा अकोलेकरांना पाच ते दहा हजारांच्या दंडाची तत्काळ वसुलीची पावती हातात देणार आहे. त्यामुळे अकोलेकरांनी जपवून पाणी वापरावे, अशी चर्चा मनपा वर्तुळात आहे.

### अकोलेकरांच्या पाण्यासाठी युद्धापातळीवर सोय : आमदार रणधीर सावरकर



दरम्यान, केवळ शेतीच नव्हे तर अकोला शहर व ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी स्थानिक प्रशासन व लोकप्रतिनिधी सतर्क झाले आहेत. पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू नये आणि नागरिकांना नियमित पाणीपुरवठा व्हावा यासाठी युद्ध पातळीवर आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या जात असल्याचे भाजपचे वरिष्ठ नेते तथा आमदार रणधीर सावरकर यांनी स्पष्ट केले. जल प्रकल्पांतील साठ्याचे योग्य नियोजन करून अकोलेकरांना पाण्याचा त्रास होऊ दिला जाणार नाही, असा विश्वास त्यांनी दिला आहे.बाप्पांच्या आगमनापूर्वी झालेली ही पर्जन्यवृष्टी संकटग्रस्त शेतकऱ्यांसाठी वरदान ठरेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. शहरासाठी अत्यंत दिलासादायक बातमी समोर आली आहे. काल रात्री आलेल्या माहितीनुसार चाकाचे धरण पूर्णपणे भरले असून, आता थोडा जरी पाऊस झाला तरी काटेपुर्णा धरणात पाणी येणार आहे. शहराची पाण्याची वार्षिक गरज ही सुमारे २५ ते २६ दशलक्ष घनमीटर इतकी आहे. धरण ५० टक्के जरी भरले तरी शहराची पाण्याची गरज सहज भागू शकते. धरण पूर्ण भरल्यास आता पर्यायी किंवा इतर कोणत्याही अतिरिक्त पाणीयोजना राबवण्याची गरज पडणार नाही, असा विश्वास आ.सावरकर यांनी व्यक्त केला आहे. या जलसाठ्यामुळे शहराचा आगामी काळातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न पूर्णपणे सुटण्यास मदत होणार आहे. पण, गरज पडल्यास टंचाईची झळ सामान्य अकोलेकरांना बसू नये यासाठी मोर्णा येथून ३० किमी.लांबीची पाईपलाईन टाकत आवश्यक त्या प्लोटिंग किंवा कायमस्वरुपी हेडवर्क करत पाणी काटेपूर्णात आणण्याचा आमचा प्रयत्न आहे.

---

शिक्षक मतदारसंघाच्या रणधुमाळीत

# अदिती पोहरे उतरणार

## संघटनांच्या आग्रहास्तव निवडणूक लढविण्याचा निर्धार

प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**अकोला :** आगामी काही महिन्यांत होऊ घातलेल्या अमरावती विभागीय शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीचे पडघम आतापासूनच वाजू लागले आहेत. सर्वच इच्छुकांकडून जोरदार मोर्चेबांधणी सुरू असतानाच, उच्चशिक्षित आणि अभ्यासू व्यक्तिमत्त्व अदिती ऋषिकेश पोहरे यांनी निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. एका प्रमुख शिक्षक संघटनेसह समर्थक शिक्षकांच्या आग्रहाला मान देत त्यांनी हा निर्धार केल्यामुळे अमरावती विभागातील राजकीय वातावरणात नव्या चर्चेला उधाण आले आहे.



### शिक्षकांच्या प्रश्नांना मिळणार नवा आवाज

वेतन, सेवाश्रृती, पदोन्नती, अनुदानाचे प्रश्न आणि प्रशासकीय अडचणी यांसारख्या विविध ज्वलंत प्रश्नांवर शासनाच्या पातळीवर भक्कम मांडणी करू शकणाऱ्या अभ्यासू नेतृत्वाची शिक्षकांना गरज होती. समर्थकांच्या आग्रहाखातर त्यांनी निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला असून शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. उच्चशिक्षित पार्श्वभूमी, अध्यापनाचा प्रदीर्घ अनुभव, सामाजिक भान आणि राजकीय वारसा यांमुळे अदिती पोहरे यांच्या उमेदवारीने अमरावती विभागीय शिक्षक मतदारसंघातील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### शिक्षण क्षेत्राचा वारसा अन् उच्चशिक्षित पार्श्वभूमी

अदिती पोहरे या माजी कृषी मंत्री हर्षवर्धन उर्फ भैय्यासाहेब देशमुख यांच्या कन्या असून त्यांना राजकीय व सामाजिक क्षेत्राचा मोठा वारसा लाभला आहे. त्यांची शैक्षणिक पार्श्वभूमी अत्यंत लक्षवेधी आहे. त्यांनी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय (अमरावती) येथून 'एम.ई. स्ट्रक्चरल डिझाईन' ही पदव्युत्तर पदवी विशेष प्रावीण्यासह पूर्ण केली आहे. यासोबतच त्यांनी 'एम.ए. मानसशास्त्र'ची पदवीही संपादन केली आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, अकोला येथे २०१० पासून त्या पदव्युत्तर स्तरावर विशेष प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. अनेक शोधप्रबंध व संशोधन प्रकल्पांचे त्यांनी यशस्वी मार्गदर्शन केले आहे. याशिवाय त्या 'देशोन्नती'मध्ये संचालक व 'मनस्विनी' व्यासपीठाच्या संस्थापक अध्यक्ष म्हणून सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत आहेत.

---

# शाह मुंबईत केवळ ‘कलेक्शन’साठी येतात!

## खा. संजय राऊत यांचे टीकास्त्र; जरांगेंच्या भाषेचे केले समर्थन

प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**मुंबई :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या मुंबई दौऱ्यावरून शिवसेना (उबाठा) नेते संजय राऊत यांनी जोरदार हल्लाबोल केला आहे. 'अमित शाह हे मुंबईत केवळ फंड कलेक्शनसाठी येतात. मुंबईत बिल्डर, जमिनीचे व्यवहार करणारे लोक आणि हजारो कोटींच्या थैल्या असल्याने ते येथे रमतात,' असा गंभीर आरोप राऊत यांनी केला आहे. सोबतच मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा देत, त्यांच्या भाषेवर आक्षेप घेणाऱ्या राज्य सरकारचा राऊत यांनी चांगलाच समाचार घेतला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर रोजी राबवल्या जाणाऱ्या 'सेवा संकल्प अभियाना'वरही राऊतांनी जोरदार टीका केली. 'गेल्या २५ वर्षांत त्यांनी कुणाची सेवा केली, हे देशाने पाहिले आहे. दोन-चार उद्योगपतींची सेवा करण्यापलीकडे, त्यांची लाखो कोटींची कर्जे माफ करण्यापलीकडे आणि देशाची सार्वजनिक संपत्ती मातीमोल भावात विकण्यापलीकडे त्यांनी कोणतीही सेवा केलेली नाही,' असा घणाघात संजय राऊत यांनी केला.

मनोज जरांगे पाटील यांच्या 'मुंबई चलो' आंदोलनावर बोलताना राऊतांनी त्यांना पूर्ण पाठिंबा दर्शवला. 'जरांगे शिवराळ भाषा वापरतात म्हणून त्यांच्याशी चर्चा होत नाही, असे सरकारचे म्हणणे आहे. पण पुण्यात विद्यानंद बापट हे अत्यंत सभ्य आणि संस्कारी भाषेत आंदोलन करतात. मग त्यांच्यावर सरकार पुरस्कृत गुंडांनी हल्ला का केला?' असा सवाल राऊत यांनी विचारला. बाळासाहेब ठाकरेंच्या शिकवणीचा संदर्भ देत, 'ज्याला जी भाषा कळते तीच वापरावी, जर सरकारला शिवीची भाषा कळत असेल, तर तीच भाषा वापरायला पाहिजे,' असे म्हणत त्यांनी जरांगेंच्या भाषेचे समर्थन केले.



### शहांनी १०० गाड्यांचा ताफा घेऊन फिरू नये!

अमित शाह यांच्या दौऱ्यामुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीकडे लक्ष वेधताना राऊत म्हणाले की, 'मुंबई ही गजबजलेली आहे. सणासुदीत लोकांना बाहेर पडावे लागते. अशा वेळी गृहमंत्र्यांनी १०० गाड्यांचा ताफा घेऊन फिरू नये. मुंबईतील लोक पापभिरू आहेत, ते कुणालाही हात लावत नाहीत. तुम्ही असे काही महान राष्ट्रकार्य केलेले नाही की आंतरराष्ट्रीय शक्ती तुमच्या जीवावर उठलेल्या आहेत, असा खोचक सवालही राऊत यांनी उपस्थित केला.

---

# 1995 मधील तंत्रज्ञान आज अपुरे!

## नितीन गडकरी अडकले वाहतूक कोंडीत

प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**मुंबई :** देशभरात रस्त्यांचे जाळे विणणारे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी शनिवारी मुंबईच्या भीषण वाहतूक कोंडीत अडकले. वरळी ते कार्यक्रमाच्या ठिकाणापर्यंत पोहोचण्यासाठी गडकरींना तब्बल एक तास उशीर झाला. कारण मी वरळीहून निघाल्यावर ट्रॅफिकमध्ये अडकलो होतो. पण खरे सांगायचे तर, मी माझ्याच चुकीची भरपाई करत आहे. १९९५ ते २००० या काळात महाराष्ट्राचा सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना मला मुंबईत ५५ उड्डाणपूल, वांद्रे-वरळी सी लिंक आणि मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे बांधण्याची संधी मिळाली. पण त्या काळात आजचे आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध नव्हते.



मुंबईत पार पडलेल्या ‘इंडो-अमेरिकन कॉर्पोरेट एक्सलन्स अवॉर्ड्स’ सोहळ्यात गडकरी बोलत होते. वाहतूक कोंडीच्या या अनुभवाचा धागा पकडत त्यांनी देशातील पायाभूत सुविधांच्या आधुनिकीकरणावर आणि भारत-अमेरिका तंत्रज्ञान सहकार्यावर भर दिला. गेल्या काही दशकांत वाहनांची संख्या प्रचंड वाढली आहे. त्यामुळे जुन्या तंत्रज्ञानावर आधारित हे पूल आता अपुरे पडत आहेत. त्यामुळे पारंपरिक डिझाइनवर अवलंबून न राहता जुने उड्डाणपूल हटवून नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा सल्ला मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिला आहे,’ असेही त्यांनी स्पष्ट केले.

### पुण्यासाठी ५० हजार कोटींचा बहुस्तरीय ‘मल्टी-लेव्हल’ प्लॅन

शहरी भागातील ट्रॅफिकची समस्या सोडवण्यासाठी गडकरींनी नवीन तंत्रज्ञानाचा मार्ग दाखवला. ‘पुण्यासाठी ५० हजार कोटी रुपयांचा पायाभूत सुविधा प्रकल्प प्रस्तावित आहे. यासाठी मलेशियाकडून विशेष तंत्रज्ञान आणले गेले आहे. या तंत्रज्ञानामुळे एकाच खांबावर अनेक स्तरांचे उड्डाणपूल उभारता येतील, ज्यावर सर्वात वरच्या स्तरातून मेट्रो धावू शकेल,’ अशी माहिती गडकरींनी दिली.

---

# ‘ब्रिक्स’मध्ये मोदी व जिनपिंग यांचे बिनसले!

## चीनच्या राष्ट्राध्यक्षांनी ‘गाला डिनर’ला जाणे टाळले!



वृत्तसंस्था १३ सप्टेंबर

**दिल्ली :** ब्रिक्स परिषदेसाठी उपस्थित राहिलेले विविध देशांचे नेते, इतर सहभागी देश आणि आंतरराष्ट्रीय संस्थांच्या प्रतिनिधींसाठी शनिवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एका भव्य स्नेहभोजनाचे (गाला डिनर) आयोजन केले होते. मात्र, चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग या स्नेहभोजनाला उपस्थित राहिले नाहीत, अशी माहिती या घडामोडींशी संबंधित सूत्रांनी दिली आहे. अबुधाबीचे युवराज (क्राउन प्रिन्स) शेख खालिद बिन मोहम्मद हे देखील या कार्यक्रमाला अनुपस्थित होते, कारण परिषदेत सहभागी झाल्यानंतर ते लगेच आपल्या मायदेशी रवाना झाले होते. शी जिनपिंग यांच्या अनुपस्थितीचे नेमके कारण तत्काळ समजू शकले नसले, तरी ते विश्रांतीसाठी आपल्या हॉटेलवर परतले असावेत, असा अंदाज एका सूत्राने वर्तवला आहे. जिनपिंग हे शनिवारी दुपारी दिल्लीत दाखल झाले होते, त्यानंतर त्यांनी ब्रिक्स परिषदेला हजेरी लावली आणि पंतप्रधान मोदी यांच्यासोबत द्विपक्षीय बैठकही घेतली. तब्बल सात वर्षांनंतर ते भारत दौऱ्यावर आले आहेत.

### डिनरमध्ये खास काय?

या स्नेहभोजनाच्या मेन्यूमध्ये खांडवी मिल-फ्युल, खुंभ गलौटी, पनीर लबाबदार, गुच्छी मार्मिक, गाजर-बीन्स पोरियाल आणि मिलेट (धान्य) पुलाव यांचा समावेश होता. तर गोड पदार्थांमध्ये जलेबीसोबत पुरानी दिल्लीची प्रॢट क्रीम आणि फिरणी वाढण्यात आली होती. भारत १२ आणि १३ सप्टेंबर रोजी ब्रिक्स परिषदेचे यजमानपद भूषवत असून, यामध्ये ११ सदस्य देश आणि १० भागीदार देशांचे नेते तसेच काही आंतरराष्ट्रीय संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले आहेत.

### केंद्रीय आणि राज्यातील मंत्रीही गाला डिनरला हजर

केंद्रीय मंत्री अमित शाह, निर्मला सीतारामन, पीयूष गोयल, अश्विनी वैष्णव आणि शिवराज सिंह चौहान यावेळी उपस्थित होते. लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यासह उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदु अधिकारी आणि आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा हे देखील या कार्यक्रमाला उपस्थित होते. हे केंद्रीय मंत्री आणि मुख्यमंत्री संसद भवनातून दोन बसमधून या स्नेहभोजनाचे ठिकाण असलेल्या भारत मंडपम येथे पोहोचले.






# गणेशभक्तांची प्रतीक्षा संपली..!

गणेशभक्तांची प्रतिक्षा अखेर संपली आहे. उद्या म्हणजे सोमवारी गणरायाचं आगमन होणार आहे.

पण त्याआधी घरात कोणत्या गोष्टींची तयारी झाली पाहिजे, हे जाणून घेणं महत्त्वाचं आहे. असं म्हणतात की, गणपतीच्या आगमनाने घरात ज्ञान, शुभता, संपत्ती आणि सकारात्मकता येते. गणेशाचं स्वागत करण्यापूर्वी घर पूर्णपणे स्वच्छ करा. मूर्ती स्थापनेची जागा आणि पूजा खोलीत असलेल्या अनावश्यक वस्तू दुसऱ्या जागेवर ठेवा. घरात स्वच्छता असेल तर, अत्यंत पवित्र वाटतं. त्यामुळे स्वच्छतेला प्राधान्य द्या. पूजास्थळी एक स्वच्छ चैरंग ठेवा आणि त्यावर लाल किंवा पिवळे कापड पसरा. फुले, आंब्याची पाने, रांगोळी आणि दिव्यांनी मंडप सुंदरपणे सजवा.

# महाराष्ट्रासह देशात बाप्पाच्या आगमनाची जय्यत तयारी!

संपूर्ण सृष्टीचे पालनहार देवाधिदेव महादेव भोले शंकर,तर त्यांचे पुत्र गणपती बाप्पा विघ्नहर्ता व ज्ञानदाता सागर आहेत. त्यामुळेच श्रीगणेशांना सर्वच बाबतीत प्रथम स्थान देण्यात आले आहे. गणपती बाप्पा हिंदू धर्मातील आराध्य दैवत मानल्या जाते. कोणतीही पुजा-अर्चना असो सर्वप्रथम श्रीगणेशाची पूजा केली जाते.नंतरच इतर देवतांची पूजा केली जाते.कारण श्रीगणेश म्हणजे बुद्धीचा सागर,शांतीचे प्रतीक व बालगोपालांचे आवडते दैवत. देशात कोणत्याही देवी-देवतांची पुजा असो,परंतु आरतीची सुरूवात गणपतीच्या आरती पासून होत असते.याचाच अर्थ पृथ्वीतलावर गणेश वंदनेला सर्वप्रथम प्राधान्य देण्यात येते.रावणासारख्या महाकाय शक्तीला रोखण्याचे काम सुध्दा श्रीगणेशांनी केले.श्रीगणेशांना अनेक नावांनी संबोधले जाते गौरी पुत्र,अष्टविनायक अशा अनेक नावांनी श्रीगणेशांची पुजाअर्चना केली जाते.गणेशजी देवता आदिदेव असल्याने त्यांचे प्रत्येक युगात वेगवेगळे अवतार पहायला मिळतात.गणेशजीला चार हात असतात हे चारही हात म्हणजे वेगवेगळ्या दिशांमध्ये व्यापकतेचे प्रतिक मानल्या जाते.देवी पार्वती आंघोळीला गेली असता गणपतीला पार्वतीने सांगितले की माझी आंघोळ होत नाही तोपर्यंत घरात कुणालाही प्रवेश द्यायचा नाही.गणपतीने आई पार्वतीला वचन दिले की ठीक आहे.कोणालाही घरात प्रवेश करू देणार नाही. परंतु तेवढ्यात भगवान शंकरजी दारात आले आणि म्हणाले की बेटा हे माझे घर आहे मला घरात जाऊदे.गणेशजीने भगवान शंकरजीना प्रवेश नाकारला व क्रोधित होवून गणपतीचे डोके त्याच्या धडापासून वेगळे केले.हे पाहुण आई विचलित झाली व काही क्षणातच शंकरजीला आपली चूक लक्षात आली आणि आपल्या दैवी शक्तिच्या आधारावर गणपतीच्या धड्यावर गजाचे मस्त ठेवले आणि गणपतीला जिवदान मिळाले.भगवान शंकरजीनी आपली चुक कबुल करत संपूर्ण ब्रम्हांडात गर्जना केली की पुजेचा पहिला मान गणपतीला दिला जाईल असे गणपतीला वर्दान दिले. म्हणुनच गणपतीची प्रथम पुजा केली जाते.श्रीगणेशजी विवाहित होते त्यांना दोन बायका होत्या एकीचं नाव रिद्धी आणि दुसरीचे नाव सिद्धी होते.यांना दोन मुलं होती शुभ आणि लाभ त्यामुळे प्रथम पुजा गणेशची होते व सोबतच शुभ-लाभ दिसून येते.यात आपल्याला सर्वत्र शुभ संकेत दिसून येतात.आपल्याला अनेक पुराणांमध्ये गणपतीचे अनेक नावे पहायला मिळतात यात एकदंत, विनायक, लंबोदर,भालचंद्र,गजानन इत्यादी विभिन्न नावांनी आपण श्रीगणेशाची आराधना करीत असतो. त्याचप्रमाणे ज्योतिष शास्त्रानुसार श्रीगणेशांना केतू म्हणून ओळखले जाते केतू हा शांत ग्रह असल्याने संपूर्ण सृष्टीत सावलीची भुमिका पार पाडते व राहु ग्रहांच्या विरोधात सदैव ठाम भूमिका बजावीत असते.त्यामुळेच म्हणतात विरोधाशिवाय ज्ञान नसते आणि ज्ञानाशिवाय मुक्ती नसते. त्यामुळे गणपती देवता हिंदू धर्मातील बुद्धीचा अधिष्ठाता, विघ्नांचा नियंत्रक मानला जाणारा देव आहे म्हणूनच श्रीगणेशाला आपण विघ्नहर्ता म्हणतो.भारत अनेक धर्मांनी, जाती-पंथाने विनलेला देश



आहे.त्यामुळे प्रत्येक धर्म आपापल्या पद्धतीने आपापल्या संस्कृती प्रमाणे सण साजरे करतांना दिसतात.भारतात प्रत्येक दिवसाला आगळेवेगळे महत्त्व असून वेगवेगळ्या देवी-देवतांची महत्त्व आहे त्यापध्दतीने पुजा-अर्चना केली जाते.प्रत्येक गणेश चतुर्थीला गणेशाची आराधना करून भक्तगण आपली मनोकामना पूर्ण करण्याचा सर्वच प्रयत्न करतात.परंतु भाद्रपद महिन्यातील शुद्ध चतुर्थी म्हणजे गणेशोत्सव.गणेशमुर्तीची स्थापना करून गणेशोत्सव तब्बल १० दिवस चालतो.या कालावधीत महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात आपल्याला रोषणाईची झगमगाट दिसून येते.यापध्दतीने गणेशोत्सवाचा आनंद संपूर्ण लोक मोठ्या उत्साहाने व गुना गोविंदाने साजरा करतात. लोक गणेशोत्सवात इतके तल्लीन होऊन जातात की १० दिवस कसे गेले हे कोणालाच कळत नाही.गणपती बाप्पा पुन्हा लवकर यावा यासाठी "गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या"घोषणांचा गजर करत गणपती बाप्पाला निरोप दिला जातो.इंग्रजांना शह देण्यासाठीच लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरूवात केली.गणेशोत्सवाच्या निमित्ताने जनजागृती करून इंग्रजां विरूद्ध मोठा लढा उभारला व आक्रमक पवित्रा निर्माण केला.त्यामुळे गणेशोत्सव हा सण स्वतंत्र लढ्यासाठी सूध्दा कारगर सिध्द झाला. लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाची लावलेली परंपरा आजही संपूर्ण महाराष्ट्रासह भारतात दिसुन येते. त्यामुळेच महाराष्ट्रात गणेशोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. पुराणानुसार परशुराम एकवीस वेळा पृथ्वी नि:क्षत्रिय करून कैलासी आले असता दरबार रक्षक गणेशाने त्यास अडवले व दोघांमध्ये घनघोर युद्ध झाले.यात परशुरामाच्या परशुमुळे गणेशाचा एक दात तुटला त्यामुळे श्रीगणेशांना एकदंत सूध्दा म्हणतात असे पुराणामध्ये नमुद आहे. गणेशाला पुजेचे स्थान प्रथम असल्याने आपण पाहतो प्रत्येक मंदिरात आपल्याला गणेशाची मूर्ती दिसुन येते ते मग कोणतेही मंदिर असो. गणेशाचे मुख्य वाहन मुशकराज (उंदीर) त्यामुळे श्रीगणेशा सोबतच उंदराची सूध्दा पुजा-अर्चना केली जाते.पुजेमध्ये मुख्यत्वेकरून दुर्वा, बेल-फुल,शम्मीपत्र,शेंदूर यांचा मुख्यत्वे करून वापर होतो. भारतात श्रीगणेशांची अनेक मोठ-मोठी नामांकित मंदिरे आहेत. त्याचबरोबर नेपाळमध्ये आपल्याला गणेशाची असंख्य मंदिरे पहायला मिळतात.कारण श्रीगणेश हे विघ्नहर्ता आहेत त्यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक घरामध्ये मुख्य दारावर गणपतीची फोटो आपल्याला दिसुन येते.मानवजातीला देवी-देवतांनी पृथ्वीची रक्षा करण्यासाठी पृथ्वीतलावर जन्म दिला.परंतु मानवजातीने या धरतीमातेचा दुरूपयोग केल्यामुळे पृथ्वीतलावरील निसर्गाचा दिवसेंदिवस ह्यास होत आहे.याला वाचविण्यासाठी गणेशोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात १० दिवस वृक्ष लागवडीची मोहीम सरकार मार्फत,प्रशासना मार्फत, शाळा-महाविद्यालय, सामाजिक संस्थांमार्फत व संपूर्ण गणेश मंडळांच्या मार्फत वृक्षारोपण व्हायला पाहिजे.यामुळे संपूर्ण भारतात हिरवागार गालिचा निर्माण होईल व येणारे महाप्रलय रोखण्यास मोठी मदत होईल, पृथ्वीचे संतुलन राखण्यास मोठी मदत होईल व सर्वत्र हिरवागार गालिचा पसरलेला दिसुन येईल.यातही आपल्याला गणेशोत्सवाचा आनंद अवश्य दिसून येईल. गणपती बाप्पा मोरया!


**रमेश कृष्णराव लांजेवार**

( स्वतंत्र पत्रकार ) मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.


# बलात्कार विरोधी विधेयक

## काल वर्तमान पत्र वाचत होतो. एक दिवसाच्या वर्तमान पत्रात वेगवेगळ्या शिर्षकाच्या पाच बातम्या वाचनात आल्या

"धावत्या बस मध्ये १६ वर्षीय विद्यार्थिनीवर सामुहिक बलात्कार", "कालसर्प दोष निवारणाच्या बहाण्याने विवाहितेवर अत्याचार", "लिफ्ट देण्याच्या बहाण्याने विद्यार्थिनीची छेडछाड", "त्वचारोग तज्ञाकडून उपचाराच्या नावाखाली तरुणीचा विनयभंग", "चिमुरडीवर लैंगिक अत्याचार शाळेचा बस चालक अटकेत, भोंदू बाबा खरातची बातमी, रोहित संजय वासनिक याने बालिकेवर केलेले अत्याचार"

हा तर झाला एकाच दैनिकाचा प्रकार. अशा प्रकारच्या अनेक बातम्या इतर वर्तमान पत्रात दररोज प्रकाशित होत असतात. एकतर्फी प्रेमातून मुलींच्या अंगावर पेट्रोल ओतून जिवंत जाळणे, भरचौकात कॉलेज तरुणींवर चाकूने हल्ला करून कत्तल करणे अशा घटना घडत आहेत. तसेच प्रेमी युगलांच्या प्रकरणात प्रेमात अडथळा नको म्हणून पतीचा काटा काढण्याचे प्रकारही कमी नाहीत; कुठे पर्यटनाच्या ठिकाणी कड्यावरून ढकलून, तर कुठे झोपेच्या गोळ्या देऊन पतीची हत्या केली जाते.

काही महिन्यांपूर्वी नागपूर येथील चार वर्षाच्या बालिकेवर ६५ वर्षाच्या विकृत माणसाने बलात्कार करून हत्या केल्याचे प्रकरण ताजे असताना पुन्हा अशा प्रकारच्या घटना घडणे अतिशय चिंताजनक आणि समाज म्हणून असणारी आपली सामूहिक जाणीव अधोरेखित करणारी आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरोच्या आकडेवारीनुसार दर १८ मिनिटांनी एका बलात्काराची नोंद होते. याशिवाय बरेच गुन्हे इज्जतीच्या व बदनामीच्या भीतीने नोंद न झालेले अपराध कितीतरी पटीने जास्त असू शकतील.

अशा प्रकारचे गुन्हे सिद्ध झाल्यानंतर जास्तीत जास्त जन्मठेप किंवा फाशी दिली जाते. जन्मठेप म्हणजे तुरुंगात आरामशीर बसून फुकटच्या भाकरी खाऊन जीवन जगणे, आणि फाशी म्हणजे जीवनाच्या दररोजच्या कटकटीतून नकळत एकदाच वेदना सहन करून खुशाल जीवन संपविणे. कायद्याची ही शिथिलता ठाऊक असल्यामुळे नराधम कोणत्याही प्रकारचे भय न बाळगता निर्भयपणे गुन्हे करत असतात.

माझ्या मते, लहान निष्पाप बालिकेवर असो वा महिलेवर अत्याचार असो, अशा नराधमांना केवळ जन्मठेप किंवा फाशी न देता त्यांचे दोन्ही हात मनगटापासून कापून उपचार करून जगण्यासाठी सोडून द्यावे. देशाच्या संसदेत भत्ते वाढविण्याचे विधेयक असो किंवा इतर कोणत्याही विषयावर चर्चा सुरू असते, परंतु कोणत्याही राजकारण्याला बलात्कार विरोधी कठोर विधेयक संसदेत मांडून त्यावर सखोल चर्चा करावी असे वाटत नाही.

"बहुतेक अरब राष्ट्रात शरिया प्रमाणे (इस्लामी कायदा) व्यभिचाऱ्याला अगदी उघडपणे शिक्षा दिली जाते. चोरी करणाऱ्यांचे हात कापणे, कत्तलीचा बदला म्हणून कत्तल करणे अशा प्रकारच्या शिक्षा भर चौकात देण्याची प्रथा असल्यामुळे त्या ठिकाणी असे गंभीर स्वरूपाचे अपराध नगण्य स्वरूपात पहावयास मिळतात.".


**इद्रीस खान,** पुसद


# 'घालीन लोटांगण' या प्रार्थनेचे रहस्य!



कोणत्याही देवाच्या आरतीनंतर एका सुरात व धावत्या चालीत 'घालीन लोटांगण' ही प्रार्थना म्हटली जाते. अतिशय श्रवणीय व नादमधुर असल्याने खूपच लोकप्रिय आहे. सर्वत्र म्हटली जाते व भक्त त्यात तल्लीन होऊन जातात. आज आपण या प्रार्थने मधील वैशिष्टे पाहूया, त्याचा अर्थ समजावून घेऊ. ही प्रार्थना चार कडव्याची आहे व पाचवे कडवे हा एक मंत्र आहे. अशी ही वेगवेगळ्या कवींची, वेगवेगळ्या भाषेचे मिश्रण असलेली प्रार्थना अत्यंत श्रवणीय आहे. तिचे नादमाधुर्य व चाल अलौकिक आहे. रचना कोणाची असो, हे गाताना भक्त तल्लीन होतात व त्यांचा भाव देवा पर्यंत पोचतो. अर्थ समजून म्हटले तर आरतीमध्ये भाव येतात.

### वैशिष्ट्ये

प्रार्थनेतील चारही कडव्यांचे रचयिता वेगवेगळे आहेत, ही चारही कडवी वेगवेगळ्या कालखंडात लिहिली गेली आहेत, पहिले कडवे मराठीत असून उरलेली कडवी संस्कृत भाषेत आहेत., बऱ्याच जणांना असे वाटते की ही गणपतीची प्रार्थना आहे. पण ही सर्व देवांच्या आरती नंतर म्हणली जाते, यातील एकही कडवे गणपतीला उद्देशून नाही, वेगवेगळ्या कवींची व वेगवेगळ्या कालखंडातील कडवी एकत्र करून ही प्रार्थना बनवली गेली आहे.

### असा आहे प्रत्येक कडव्यांचा अर्थ

१) घालीन लोटांगण वंदीन चरणी  
डोळ्यांनी पाहिन रूप तुझे ।  
प्रेमे आलिंगन आनंदे पूजीन ।  
भावे ओवाळीन म्हणे नामा ।

वरील कडवे संत नामदेवांनी तेराव्या शतकात लिहिलेली एक सुंदर रचना आहे. विठ्ठलाला उद्देशून संत नामदेव म्हणतात, तुला मी लोटांगण घालीन व तुझ्या चरणांना वंदन करीन. माझ्या डोळ्यांनी तुझे रूप पाहिन एवढेच नाही तर तुला मी प्रेमाने आलिंगन देऊन अत्यंत मनोभावे तुला ओवाळीन.

२) त्वमेव माता च पिता त्वमेव ।  
त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ।  
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव ।  
त्वमेव सर्व मम देव देव ।

हे कडवे आद्य शंकराचार्यांनी गुरुस्तोत्रात लिहिलेले आहे. ते संस्कृत मध्ये आहे. हे आठव्या शतकात लिहिले गेले आहे. तूच माझी माता व पिता आहेस. तूच माझा बंधू आणि मित्र आहेस. तूच माझे ज्ञान आणि धन आहेस. तूच माझे सर्वस्व आहेस.

(३) कायेन वाचा मनसेन्द्रियैर्वा ।  
बुद्ध्यात्मना वा प्रकृती स्वभावात ।  
करोमि यद्येत सकल परस्मै ।  
नारायणापि समर्पयामि ।।

हे कडवे श्रीमद भागवत पुराणातील आहे. ते व्यासांनी लिहिलेले आहे. श्रीकृष्णाला उद्देशून हे नारायणा, माझी काया व माझे बोलणे माझे मन, माझी इंद्रिये, माझी बुद्धी माझा स्वभाव आणि माझी प्रकृती यांनी जे काही कर्म मी करीत आहे ते सर्व मी तुला समर्पित करीत आहे.

(४) अच्युतम केशवम रामनारायणं।  
कृष्ण दामोदरम वासुदेवं हरी ।  
श्रीधर माधवं गोपिकावल्लभं ।  
जानकी नायक रामचंद्र भजे ।।

वरील कडवे आदी शंकराचार्यांच्या अच्युताकष्ठम् मधील आहे. म्हणजेच आठव्या शतकातील आहे. मी भजतो त्या अच्युताला, त्या केशवाला, त्या रामनारायणाला, त्या श्रीधराला, त्या माधवाला, त्या गोपिकावल्लभाला, त्या श्रीकृष्णाला आणि मी भजतो त्या जानकी नायक श्रीरामचंद्राला.

(५) हरे राम हरे राम ।  
राम राम हरे हरे ।  
हरे कृष्ण हरे कृष्ण ।  
कृष्ण कृष्ण हरे हरे ।

हा सोळा अक्षरी मंत्र 'कलीसंतरणं' या उपनिषदातील आहे. कलियुगाचा धर्म हे हरिनाम संकीर्तन आहे. याशिवाय कलियुगात कोणताच उपाय नाही. हा मंत्र श्री रामकृष्णाला समर्पित आहे.

# एक विकत घ्या, त्यावर एक फुकट घ्या..!

जर आपण 'राग' विकत घेतला, तर आपल्याला 'ॲसिडिटी' फुकट मिळते.  
जर आपण 'ईर्ष्या' विकत घेतली, तर आपल्याला 'डोकेदुखी' फुकट मिळते.  
जर आपण 'द्वेष' विकत घेतला, तर आपल्याला 'अल्सर' फुकट मिळतो.  
जर आपण 'ताणतणाव' विकत घेतला, तर आपल्याला 'रक्तदाब (ँझ्)' फुकट मिळतो.  
जर आपण 'विश्वास' विकत घेतला, तर आपल्याला 'मैत्री' फुकट मिळते.  
जर आपण 'व्यायाम' विकत घेतला, तर आपल्याला 'निरोगी आयुष्य' फुकट मिळते.  
जर आपण 'शांती' विकत घेतली, तर आपल्याला 'समृद्धी' फुकट मिळते.  
जर आपण 'प्रामाणिकपणा' विकत घेतला, तर आपल्याला 'झोप' फुकट मिळते.  
आता हे सर्व आपल्यावर अवलंबून आहे की, आपण काय विकत घेतलं पाहिजे.... ते आपणचं ठरवायचं आहे. फक्त एकदा विचार करून बघा.

### हे समजून घेतले पाहिजे..!




१. टायर चालताना घासले जातात, पण पायाचे तळवे आयुष्यभर धावत राहूनही नवीनच राहतात. २. शरीर ७५ टक्के पाण्याने बनलेले आहे, तरीही लाखो रोमछिद्र असूनसुद्धा एक थेंबही गळत नाही. ३. कोणतीही वस्तू आधाराशिवाय उभी राहू शकत नाही, पण हे शरीर स्वतःचा तोल राखते. ४. कोणतीही बॅटरी चार्जिंगशिवाय चालत नाही, पण हृदय जन्मापासून मृत्यूपर्यंत अखंड धडकत राहते. ५. कोणताही पंप कायम चालू राहू शकत नाही, पण रक्त आयुष्यभर अखंड शरीरभर वाहत राहते. ६. जगातील सर्वात महागडे कॅमेरेही मर्यादित आहेत, पण डोळे हजारो मेगापिक्सेल गुणवत्तेत प्रत्येक दृश्य टिपू शकतात. ७. कोणतीही प्रयोगशाळा सर्व चवी तपासू शकत नाही, पण जीभ कोणत्याही उपकरणाशिवाय हजारो चवी ओळखू शकते. ८. सर्वात प्रगत सेन्सरही मर्यादित असतात, पण त्वचा अगदी हलकीशी संवेदना देखील जाणवू शकते. ९. कोणतेही यंत्र सर्व आवाज निर्माण करू शकत नाही, पण कंठातून हजारो फ्रिâक्वेन्सीचे स्वर निर्माण होऊ शकतात. १०. कोणतेही उपकरण सर्व आवाजांचे पूर्ण अर्थ लावू शकत नाही, पण कान प्रत्येक आवाज ओळखून त्याचा अर्थ समजतात. निसर्गाने आपल्याला दिलेल्या या अमूल्य देणग्यांसाठी त्याचे आभार माना आणि त्याच्याबद्दल तक्रार करण्याचा आपल्याला काहीही अधिकार नाही.

# स्वच्छंदवादी निसर्गस्नेही कवी श्रीधर पाठक



आज स्मृतिदिन

श्रीधर पाठक यांचा आज स्मृतिदिन. ते प्रसिद्ध हिंदी कवी होते. त्यांचा जन्म ११ जानेवारी १८५८ रोजी उत्तर प्रदेशातील जोंधरी गावी झाला. त्यांचे घराणे मूळचे पंजाबचे. वडिलांचे नाव लीलाधर. ते कृष्णभक्त आणि धर्मपरायण होते. श्रीधर पाठक यांनी घरीच संस्कृतचे अध्ययन सुरू केले. कौटुंबिक कलहामुळे लीलाधर पाठकांनी जोंधरी सोडले व ते सोंठीको नगरा या गावी आले. त्यामुळे श्रीधर पाठकांचे शिक्षण खंडित झाले. वयाच्या अकराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. चौदाव्या वर्षी पुन्हा त्यांचे शिक्षण सुरू झाले. १८८१ मध्ये 'प्रवेश' परीक्षा पास होऊन ते महाविद्यालयात प्रविष्ट झाले, तथापि तेथे प्राचार्यांशी भांडण झाल्यामुळे त्यांनी शिक्षण सोडले ते कायमचेच. त्यांची वृत्ती अध्ययनशील असल्यामुळे त्यांचा व्यासंग मात्र चालूच राहिला. मध्यंतरी त्यांनी काही काळ कायद्याचाही अभ्यास केला, परंतु परीक्षा मात्र ते देऊ शकले नाहीत. त्यांनी विविध खात्यांत सरकारी नोकरी केली.

सेवानिवृत्तीनंतर ते अलाहाबाद येथे येऊन स्थायिक झाले. हिंदी, संस्कृत व इंग्रजी या भाषांवर त्यांचे चांगले प्रभुत्व होते. १९९५ मध्ये लखनौ येथे भरलेल्या पाचव्या हिंदी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. श्रीधर पाठक यांनी गोल्डस्मिथच्या हरमिट काव्याचा 'एकान्तवासी योगी' (१८८६) या नावाने अनुवाद केला.'मनोविनोद', 'घन विनय', 'गुनवंत हेमंत', 'वनाष्टक', 'देहरादून', 'गोखले गुणाष्टक', 'गोखले प्रशस्ति', 'गोपिकागीत', 'भारतगीत', 'स्वर्गीय वीणा', 'तिलस्माती सुंदरी' इत्यादी त्यांचे काव्यसंग्रह उल्लेखनीय होत.

निसर्गसौंदर्य, देशभक्ती व समाजसुधारणा हे विषय त्यांच्या काव्यात प्रामुख्याने आले आहेत. हिंदी खडी बोलीचा काव्यात उपयोग करण्यास त्यांनी विशेष हातभार लावला. निसर्गप्रेम, खडी बोलीचा उपयोग आणि स्वच्छंदतावादी वृत्ती या तीन वैशिष्ट्यांमुळे ते भारतेंदु युग, द्विवेदी युग व पुढचे छायावादी युग यांच्यातील महत्त्वाचा दुवा मानले जातात.

श्रीधर पाठक हे निसर्ग सौंदर्य, मातृभूमी प्रेम आणि सामाजिक सुधारणेच्या भावना व्यक्त करणारे हिंदी कवी होते. ते निसर्गप्रेमी, साधे, उदार, विनम्र, दयाळू, लहरी आणि विनोदी होते. ते हिंदी साहित्य संमेलनाच्या (१९१५, लखनौ) पाचव्या सत्राचे अध्यक्ष होते आणि त्यांना 'कविभूषण' या उपाधीने सन्मानित करण्यात आले होते. त्यांना हिंदी, संस्कृत आणि इंग्रजी भाषांमध्ये समान अधिकार होते.

त्यांचा जन्म उत्तर प्रदेशातील आग्रा जिल्ह्यातील फिरोजाबाद तहसीलच्या जौनवारी गावात,पंडित लीलाधर यांच्या घरी झाला. श्रीधर पाठक हे सारस्वत ब्राह्मणांच्या कुटुंबातील होते, जे ८ व्या शतकात पंजाबमधील सिरसा येथून येऊन आग्रा जिल्ह्यातील जोधारी गावात स्थायिक झाले. सुसंस्कृत कुटुंबात जन्म झाल्यामुळे त्यांना अगदी सुरुवातीपासूनच या विषयात रस होता. लहानपणीच त्यांना घरात संस्कृत आणि फारसी भाषेचे चांगले ज्ञान मिळाले. यानंतर औपचारिक शालेय शिक्षण घेऊन ते इंग्रजी प्रवेश परीक्षा (१८७५) आणि 'इंग्रजी माध्यमिक' (१८७९) परीक्षेत प्रथम आले. त्यानंतर 'प्रवेश परीक्षेत' (१८८०-८१) सुद्धा ते प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. त्या काळात भारतात प्रवेश मिळेपर्यंतचे शिक्षण पुरेसे मानले जात असे. त्यांची नियुक्ती सरकारी सेवेत झाली. सुरुवातीला त्यांनी कलकत्ता येथील कार्यालयात जनगणना आयुक्त म्हणून काम केले. त्या काळात ब्रिटिश सरकारची बहुतेक केंद्रीय कार्यालये कलकत्ता येथे होती. जनगणनेच्या निमित्ताने त्यांना भारतातील अनेक शहरांमध्ये जावे लागले. या काळात त्यांनी विविध डोंगराळ राज्यांमध्ये प्रवास केला आणि निसर्गसौंदर्य जवळून अनुभवण्याची संधी त्यांना मिळाली. कालांतराने, त्यांनी इतर अनेक कार्यालयांमध्येही काम केले, ज्यामध्ये रेल्वे, सार्वजनिक बांधकाम आणि सिंचन विभागाची नावे विशेष उल्लेखनीय आहेत. हळूहळू ते अधीक्षक पदापर्यंत पोहोचले. १९१४ मध्ये सेवानिवृत्तीनंतर ते कायमस्वरूपी प्रयागमध्ये राहू लागले. येथेच या श्रेष्ठ कवीचे १३ सप्टेंबर १९२८ रोजी निधन झाले.

पाठक हे मूलतत्त्ववादी कवी आहेत. विषय आणि कला या दोन्हींमुळे, आधुनिक हिंदी कवितेला एक नवीन वळण दिल्याबद्दल त्यांना मुक्त विचारांचे खरे जनक म्हणून घोषित करण्यात आले. 'भावित्रा'च्या उदयानंतर त्यांनी कवितेकडे अधिक सुव्यवस्थित, वैयक्तिक आणि वास्तववादी दृष्टिकोनातून पाहण्याचे यशस्वी प्रयत्न केले आणि प्रचलित रूढी मोडून काढल्या. यशस्वी प्रयत्नांद्वारे त्यांनी हिंदीला एक नवीन रूप देण्याचा प्रयत्न केला. जरी त्यांनी ब्रजभाषा आणि खरबोली या दोन्ही भाषांमध्ये रचना केली असली तरी, ते खबाबोलीचे समर्थक होते. थोडक्यात, त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये अशी आहेत: - नैसर्गिक भाषा, वैयक्तिक आकलन, राष्ट्रीयत्व, नवीन श्लोक, शोध आणि मर्यादा, विषय, नवीन अभिव्यक्ती, नवीन भाषा, पौर्वात्य आणि पाश्चात्य तसेच जुन्या आणि नवीन गोष्टींचा समन्वय यांचा मिलाफ.

# डीजेचा दणदणाट आणि विद्यानंद बापट भाषा इफेक्ट

डीजेचा दणदणाट थांबविण्याची मागणी करीत पुण्यातील विद्यानंद बापट यांनी एक सामाजिक प्रश्न ऐरणीवर आणला; पण त्याचबरोबर त्यांनी मराठी भाषेच्या सार्वजनिक वापरालाही एक वेगळीच चालना दिली. आज माध्यमांमध्ये, समाजमाध्यमांवर आणि विविध समूहांच्या चर्चांमध्ये 'विद्यानंद बापट भाषा इफेक्ट' अशी एक अनौपचारिक संज्ञा ऐकू येऊ लागली आहे. हा इफेक्ट नेमका डीजे बंदीचा आहे की त्यांच्या भाषेचा, हा प्रश्नही तितकाच रंजक आहे!

डीजेच्या कर्णकर्कश आवाजामुळे सामान्य माणसाच्या जगण्यातील शांतता हिरावली जाते, असा बापट यांचा युक्तिवाद आहे. त्यांची भूमिका किती योग्य-अयोग्य, तिच्याशी कोण सहमत किंवा असहमत, हा स्वतंत्र चर्चेचा विषय. मात्र, आपली भूमिका मांडताना त्यांनी वापरलेली भाषा अनेकांचे कान टवकारणारी ठरली आहे. त्यांची प्रमाण मराठी, संस्कृतप्रचुर शब्दयोजना, संदर्भ आणि नेमकेपणा यामुळे त्यांच्या मुलाखतींची चर्चाही त्यांच्या मूळ मुद्द्याइतकीच रंगू लागली आहे.

कधी कधी त्यांचे एखादे वाक्य ऐकताना प्रश्न पडतो—'अभिजात मराठी' म्हणजे नेमके असेच काही असते का? कारण आजच्या झटपट संवादाच्या, इंग्रजी-मराठी संकराच्या आणि संक्षिप्त भाषेच्या काळात एखादी व्यक्ती इतक्या सहजतेने शब्दांची संपन्नता वापरते, हेच अनेकांना आश्चर्यकारक वाटते. त्यांच्या भाषेतील संस्कृत संदर्भ आणि सुभाषितांच्या वापरामुळे तर सोशल मीडियावर स्वतंत्र विनोद, मीम्स आणि चर्चांना उधाण आले आहे. मात्र बापट यांच्या



भाषेची खरी गंमत एवढीच नाही. त्यांनी स्वतःच भाषेला साधन मानले आहे, साध्य नव्हे. म्हणजेच शब्दांचे वैभव हे मुद्द्यापेक्षा मोठे नसावे, असा त्यांचा दृष्टिकोन आहे.

यातूनच 'बापट भाषा इफेक्ट'चा खरा अर्थ लक्षात येतो. डीजेच्या आवाजाने कान दणाणत असताना बापटांची भाषा मात्र मराठीच्या शब्दसंपत्तीची जाणीव करून देते! एक आवाज कानांवर आदळतो; दुसरा आवाज मनात प्रश्न निर्माण करतो. आज अनेकांना त्यांच्या डीजेविरोधी भूमिकेपेक्षा त्यांची भाषा ऐकण्यासाठी मुलाखत पुन्हा सहज ऐकावीशी वाटते, हा बदलही लक्षणीय आहे.


**प्रा.डा.सुहास उगले,** अकोला

## मोखा येथे गुणवंत विद्यार्थांचा गौरव

**बाळापूर :** तालुका पत्रकार संघाच्या वतीन ग्राम मोखा येथील श्रीसंत सखाराम महाराज विद्यालयात दहावी बारावीतील गुणवंत आणि विविध क्षेतील मान्यवरांचा सत्कार सोहळा पार पाडला. अध्यक्षस्थानी अकोला जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष शौकत अलि मिरसाहेब, प्रमुख अतिथी म्हणून मराठी पत्रकार परिषदचे सिद्धार्थ शर्मा, प्रमोद राजुरकर, संजय खांडेकर, दिलीप दांदळे, कविताताई प्रविण ढोणे, संस्थेचे अध्यक्ष अनिरुद्ध बबलु देशमुख, उरळ पोलिस स्टेशचे साहाय्यक पोलिस उपनिरिक्षीक केंद्रे, पत्रकार रमेश ठाकरे, जिल्हा उपाध्यक्ष रामदास वानखडे उपस्थित होते.

# वीजतार चोरट्या टोळीचा पर्दाफाश; सहा जण अटकेत

## तीन लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त; मूर्तिजापूर पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**मूर्तिजापूर :** तालुक्यातील शेतशिवारांमधील विद्युत वाहिन्यांवरील ॲल्युमिनियमच्या तारांची चोरी करणाऱ्या टोळीचा मूर्तिजापूर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी सहा संशयित आरोपींना अटक करून त्यांच्या ताब्यातून सुमारे ३ लाख ७ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे शेतकऱ्यांच्या वीजवाहिन्यांची चोरी करणाऱ्या टोळीला मोठा धक्का बसला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, माना ते मूर्तिजापूर-जितापूर शेतशिवारातील लघुदाब विद्युत वाहिनीवरील ॲल्युमिनियमच्या तारांची चोरी होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या प्रकरणी सहा आरोपींना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून चोरीस गेलेल्या ॲल्युमिनियमच्या तारांसह गुन्ह्यात

**शेतशिवारातील वीजवाहिन्यांना लक्ष्य**

वीजवाहिन्यांवरील तारांची चोरी झाल्यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. वीजपुरवठा खंडित झाल्याने सिंचन व्यवस्था विस्कळीत होते आणि पिकांना पाणी देण्याचे वेळापत्रकही कोलमडते. त्यामुळे अशा प्रकारच्या चोरीच्या घटनांकडे पोलिसांनी गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. पोलिसांनी आरोपींकडून १०५ किलो ॲल्युमिनियमची तार, अंदाजे १ लाख ७ हजार रुपये किमतीची, तसेच एक वाहन आणि सुमारे १ लाख ६ हजार रुपये किमतीचा इतर मुद्देमाल जप्त केल्याची माहिती समोर आली आहे.



वापरलेले वाहन व इतर साहित्य असा सुमारे तीन लाख सात हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणातील आरोपींमध्ये अब्दुल रईस अब्दुल शहीद (४६), भारत श्रीकृष्ण सूर्यवंशी (३३), लखन श्रीकृष्ण सूर्यवंशी (२७), धीरज दिलीप पांडे (२६), रूपराव किसनराव टापे (५६), नवीन घरकुळ, मूर्तिजापूर आणि शेख आसिम शेख साबीर (२४, रा. सोनारी, मूर्तिजापूर) यांचा समावेश असल्याचे वृत्त आहे.

**पोलिस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई :** ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलिस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी आणि उपविभागीय पोलिस अधिकारी वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. माना पोलिस ठाण्याचे ठाणेदार गणेश नावकर, पोलिस उपनिरीक्षक प्रदीप जोगंडे तसेच सर्वेश कावरे यांनी तपासात महत्त्वाची भूमिका बजावली. अटक करण्यात आलेल्या आरोपींना शनिवारी न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाच्या आदेशानंतर त्यांची कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास पोलिसांकडून सुरू असून, या टोळीचा आणखी कोणत्या चोरीच्या घटनांमध्ये सहभाग आहे का, याचाही तपास केला जात आहे.

**संशयावरून चौकशी; गोपनीय माहितीने लागला छडा**

कनिष्ठ अभियंता पवन पातळवंशी यांनी २ सप्टेंबर रोजी माना पोलिस ठाण्यात शेतशिवारातील लघुदाब विद्युत वाहिनीच्या खांबावरील ॲल्युमिनियमच्या तारांची चोरी झाल्याची फिर्याद दिली होती. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली. तपासादरम्यान पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे संशयितांचा माग काढण्यात आला. पोलिस चौकशीत आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर आरोपींकडून चोरीच्या तारांचा शोध घेऊन त्या जप्त करण्यात आल्या.

## युरोप दौऱ्यातून परतलेल्या दोन शेतकरी दूतांचा कृषी विभागाकडून गौरव!



प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**अकोला :** महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला शेतकरी युरोप अभ्यास दौरा यशस्वीरीत्या पूर्ण करून परतलेल्या अकोला जिल्ह्यातील दोन अभ्यासू शेतकरी दूतांचा कृषी विभागाच्या वतीने गौरव करण्यात आला. महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष प्रमोद मुरुमकार तसेच धाकली गावचे प्रगतिशील शेतकरी व आदर्श पुरस्कारप्राप्त सरपंच महेंद्र गाढवे यांना प्रशस्तीपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने १६ ते २७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत शेतकऱ्यांसाठी युरोप अभ्यास दौऱ्याचे आयोजन केले होते. या दौऱ्यात सहभागी होऊन युरोपमधील आधुनिक शेती तंत्रज्ञान, अत्याधुनिक कृषी पद्धती, पीक व्यवस्थापन तसेच शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा प्रत्यक्ष अभ्यास करण्याची संधी सहभागी शेतकऱ्यांना मिळाली. अकोला जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी डॉ. तुषार जाधव यांच्या हस्ते प्रमोद मुरुमकार व महेंद्र गाढवे यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. परदेशातील आधुनिक शेतीचा अभ्यास करून मिळालेले ज्ञान आपल्या मातीत आणि शेतकऱ्यांच्या उपयोगात आणणे हीच अशा अभ्यास दौऱ्याची खरी फलश्रुती असल्याचे त्यांनी नमूद केले. कृषी क्षेत्रातील भविष्यातील उपक्रमांसाठी आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. यावेळी कृषी उपसंचालक हरीश देशमुख, अकोला उपविभागीय कृषी अधिकारी विवेक बि-हांडे, प्रशासकीय अधिकारी संजय राठोड, कृषी सेवक शिल्पा सांगोडे यांच्यासह कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## हिवरखेड प्राथमिक आरोग्य केंद्राने घेतली स्वच्छता मोहीम हाती



प्रतिनिधी १३ सप्टेंबर

सिटी न्यूज सुपरफास्ट IMPACT

**हिवरखेड :** आयुष्मान केंद्राला व याच केंद्राच्या उपकेंद्राला गांजर गवताने घेरले होते, उपचार घेणाऱ्या रूग्णांना या गाजर गवताचा त्रास होत होता तसेच गांजर गवतामुळे विषारी प्राणी आसरा घेण्याची भीती सुद्धा येथे वाळत होती ही बाब जागरुक नागरिकांच्या माध्यमातून दैनिक सुपरफास्ट वृत्तपत्राच्या माध्यमातून आरोग्य विभागाच्या लक्षात आणून दिली या बाबत दखल घेत आरोग्य केंद्राने तत्काळ स्वच्छता करण्याची मोहीम हाती घेऊन परिसर स्वच्छ करण्याचा निर्धार केला , तसेच अंगणवाडी जवळील उपकेद्रात स्वखर्चाने फवारणी करून परिसर घाण कचऱ्या पासून मुक्त करीत आहेत येथील उपकेद्राने ही मोहीम हाती घेतली असल्याचे समजते.

## वारी पिंपरखेडमध्ये अवैध दारू विक्रीविरोधात ग्रामस्थांचा एल्गार

प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**तरुण पिढी व्यसनाधीनतेच्या विळख्यात धमकी देणाऱ्यांवर कायदेशीर कारवाईची मागणी**

**हिवरखेड :** प्रतिनिधी हिवरखेड पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या ग्राम पिंपरखेड येथील महिलांनी पुरुषांनी जागरूक नागरिकांनी हिवरखेड पोलिस स्टेशन मध्ये एल्गार उभारला निवेदनानुसार, गावातील काही व्यक्तींकडून अवैध दारूची विक्री केली जात असून, त्यामुळे विशेषतः तरुण पिढी व्यसनाधीनतेच्या विळख्यात जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. मागील दोन-तीन वर्षांच्या कालावधीत व्यसनाधीनतेमुळे गावातील अंदाजे २० ते २५ तरुण मृत्युमुखी पडल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.



अवैध दारूविक्री बंद करण्याबाबत यापूर्वी समज देण्यात आली होती. मात्र, संबंधित व्यक्तींनी चावडीवर येऊन चावडी अध्यक्ष, तंटामुक्ती समिती अध्यक्ष व ग्रामस्थांना धमकीवजा वक्तव्य केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तसेच पोलिसांना पैसे देत असल्याचा दावा करून धमकी देण्यात आल्याचेही निवेदनात नमूद आहे. या प्रकारामुळे गावातील शांतता, सामाजिक सलोखा व सार्वजनिक सुव्यवस्थेला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने समजते

## राजकीय विरोधासाठी धर्मग्रंथ जाळण्याच्या प्रवृत्तीला कायद्याच्या चौकटीत रोखा



**हिंदु राष्ट्र समन्वय समितीची खदान पोलीसला तक्रार**

**अकोला :** मुंबईतील दादर येथे ३१ ऑगस्ट २०२६ रोजी आंदोलनादरम्यान 'मनुस्मृती'च्या प्रती जाळण्यात आल्याच्या घटनेचा तीव्र निषेध नोंदवत हिंदू जनजागृती समिती आणि विविध समविचारी संघटनांच्या वतीने अकोला येथील खदान पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. या घटनेची सखोल चौकशी करून संबंधितांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

निवेदनानुसार, हे आंदोलन राष्ट्रीय युवक काँग्रेसच्या वतीने करण्यात आले होते. आंदोलनाचे नेतृत्व मुंबई युवा काँग्रेसच्या अध्यक्षा झीनत शबरीन यांनी केले असून, त्यांच्या उपस्थितीत 'मनुस्मृती'च्या प्रती जाळण्यात आल्या आहेत.

या घटनेचे फोटो व व्हिडीओ समाजमाध्यमांवर प्रसारित झाले आहेत. "आज मनुस्मृती जाळून राजकीय विरोध व्यक्त करण्याचे समर्थन केले, तर उद्या एखाद्याला इतर धर्मियांचे पवित्र ग्रंथ किंवा विचार मान्य नसल्याचे सांगून ते जाळण्याचे समर्थन करता येईल का?" असा विचारप्रवर्तक प्रश्न यावेळी उपस्थित करण्यात आला.

दादर येथील घटनेचे फोटो, व्हिडीओ आणि अन्य इलेक्ट्रॉनिक पुरावे तपासावेत तसेच घटनेमागील आयोजक, सहभागी व्यक्ती आणि इतर संबंधितांची भूमिका तपासून कायद्यानुसार योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. ही तक्रार हिंदू राष्ट्र समन्वय समितीचे श्रीराम पांडे यांनी दाखल केली. याप्रसंगी सौ. चंदा शर्मा नगरसेविका, भाजप, सौ. चंदा ठाकूर भाजपा महिला मोर्चा, राजू मंजुळकर - अध्यक्ष, विहिंप, अधिवक्ता पवनेश अग्रवाल शिवसेना, धनंजय मेहसरे - हिंदू राष्ट्र समन्वय समिती, अमोल वानखडे, सौ. अश्विनी सरोदे व सतीश सरोदे, श्रीमती श्रुती भट राष्ट्रभक्त अधिवक्ता समिती उपस्थित होते. खदान पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मनोज केदारे यांनी ही तक्रार स्वीकारली.

## पातुर येथील भंगार दुकानातील चोरीच्या तांब्याच्या तारांच्या प्रकरणावर प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**पातूर :** पातूर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील बादशहा नगर परिसरातील एका भंगार दुकानात चोरीच्या तांब्याच्या तारांशी संबंधित प्रकरणावरून शहरात चर्चेला उधाण आले आहे. या प्रकरणात पातूर पोलिसांनी कारवाई करण्याऐवजी कथित आर्थिक देवाण-घेवाणीतून प्रकरणाचा निपटारा केल्याची चर्चा पोलीस वर्तुळासह शहरात रंगत आहे.

चोरीचा माल असल्याचा संशय असलेल्या तांब्याच्या तारांच्या प्रकरणात नेमकी कोणती कारवाई करण्यात आली, माल कुठून आला, त्याची कागदपत्रे तपासण्यात आली का, तसेच संबंधित व्यक्तींविरुद्ध

**आर्थिक देवाण-घेवाणीच्या चर्चेने पातूर पोलिसांच्या भूमिकेवर संशयाची छाया**




कायदेशीर प्रक्रिया करण्यात आली का, असे प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत.

विशेष म्हणजे, या प्रकरणात आर्थिक व्यवहार झाल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू असून, त्यामध्ये तथ्य किती आहे, याबाबत अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे पोलिसांनी या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. दरम्यान, पोलिसांच्या भूमिकेबाबत निर्माण झालेल्या या चर्चेमुळे पातूर पोलिसांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जर चोरीचा माल असल्याचे निष्पन्न झाले असेल तर संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला का? आणि जर प्रकरणात तथ्य नसेल तर पोलिसांनी त्याबाबत स्पष्ट खुलासा का केला नाही? हे प्रश्न सध्या चर्चेचा विषय ठरत आहेत. या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी स्वतंत्रपणे चौकशी करून सत्य समोर आणावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## भगवान श्री रामदेव बाबा जम्मा कथा उत्साहात

प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**अकोला :** स्थानिक आळशी प्लॉट येथील श्री रामदेवबाबा मंदिर येथे भादवा सुदी दुज (चंद्रदर्शन रोजी) शनिवार, १२ सप्टेंबर रोजी भगवान श्री रामदेवबाबा उत्सवा निमित्त सकाळी ७ वा. अभिषेक-हवन आणि सकाळी व दु. १२ वा., व सायंकाळी आरती झाली.

तसेच सुप्रसिद्ध व श्रध्दा - प्रेरणेने जम्मा कथा गायिका सपनाताई इंगोले (पाटील) धामणगाव (रेल्वे) यांच्या नविनतम शैली व सुमधूर वाणीत जम्मा कथेचा भाविवकांनी लाभ घेतला.

## गणेशमूर्ती घडविताना विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला मिळाला आकार

**मुर्तीजापूर :** प्रतिनिधी फोटो — विघ्नहर्त्या गणरायाच्या आगमनाची चाहूल लागताच सर्वत्र गणेशोत्सवाच्या तयारीला वेग आला आहे. याच पार्श्वभूमीवर मुर्तीजापूर येथील व्यंकटेश बालाजी इंग्लिश स्कूलमध्ये शाडू मातीच्या गणेशमूर्ती तयार करण्याची कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी आपल्या छोट्या-छोट्या हातांनी मातीला आकार देत सुंदर गणेशमूर्ती साकारल्या. त्यामुळे शाळेच्या परिसरात भक्तिभावासोबतच सृजनशीलतेचेही



मनोहारी दर्शन घडले. गणपती बाप्पाच्या आगमनाच्या आनंदात सहभागी होत विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने शाडू माती हातात घेतली. मातीला हळुवार आकार देत कुणी बाप्पाची सोंड घडविली, तर कुणी मुकुट, कान आणि आकर्षक रूप साकारले. आपल्या कल्पनाशक्तीला कलात्मकतेची जोड देत विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या गणेशमूर्तींमधून त्यांच्या कलागुणांना आणि सर्जनशीलतेला सुंदर व्यासपीठ मिळाले. शाडू मातीपासून गणेशमूर्ती कशा तयार कराव्यात, त्यासाठी मातीची निवड, मूर्तीचा आकार, रचना तसेच पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे महत्त्व याबाबत प्रकाश निर्घे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकातून मूर्ती तयार करण्याची पद्धत समजावून सांगितली.

## टग ऑफ वॉरमध्ये अकोला जिल्ह्याच्या मुलींना कांस्यपदक



प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**१९ वर्षांखालील मुलींच्या संघाची राज्यस्तरीय स्पर्धेत दमदार कामगिरी**

**मुर्तीजापुर :** महाराष्ट्र राज्य टग ऑफ वॉर असोसिएशन आणि परभणी जिल्हा टग ऑफ वॉर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय टग ऑफ वॉर स्पर्धेत अकोला जिल्ह्याच्या १९ वर्षांखालील मुलींच्या संघाने दमदार कामगिरी करत तृतीय स्थान पटकावून कांस्यपदकावर आपले नाव कोरले. परभणी येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या राज्यस्तरीय स्पर्धेत अकोला जिल्ह्याच्या १७ वर्षांखालील, १९ वर्षांखालील तसेच वरिष्ठ गटातील मुलींच्या संघांनी सहभाग नोंदविला होता. राज्यातील विविध जिल्ह्यांमधून आलेल्या बलाढ्य संघांसमोर अकोला जिल्ह्याच्या खेळाडूंनी आत्मविश्वासाने आणि सांघिक भावनेने खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. विशेषतः १९ वर्षांखालील मुलींच्या संघाने आपल्या जिद्द, चिकाटी आणि उत्कृष्ट समन्वयाच्या जोरावर तृतीय स्थान मिळविले. सामन्यांमध्ये प्रत्येक खेळाडूने आपली जबाबदारी प्रभावीपणे पार पाडत संघाच्या विजयासाठी मोलाचे योगदान दिले. प्रतिकूल परिस्थितीतही शेवटपर्यंत संघर्ष करण्याची वृत्ती आणि सांघिक एकजूट हे अकोला संघाच्या कामगिरीचे वैशिष्ट्य ठरले. या विजयी संघात कृती सोनवणे, स्वरांजली नेमाडे, एंजल वक्ते, नमिता सोळंके, साची तासरे, सेजल चव्हाण, प्रांजली भगत आणि भूमी सोनवणे या खेळाडूंचा समावेश होता. संघाचे प्रशिक्षक म्हणून विवेक भागवत यांनी काम पाहिले, तर अमित मनवर आणि कल्पना दास यांनी व्यवस्थापक म्हणून जबाबदारी सांभाळली.

# चिमुकले रमले गणरायाची मूर्ती साकारण्यात

## सेंट पॉल्स अकॅडमीत 'बैल व गणपती' मूर्ती निर्मिती कार्यशाळेला प्रतिसाद

वि. प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**अकोट :** स्थानिक सेंट पॉल्स अकॅडमी, अकोट येथे विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती, पारंपरिक सणांचे महत्त्व आणि सर्जनशीलतेची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने 'बैल व गणपती' मूर्ती तयार करण्याची कार्यशाळा उत्साहात पार पडली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष नवनीत लखोटिया होते. यावेळी उपाध्यक्ष लुणकरणजी डागा, सचिव प्रमोदजी चांडक, रेखा चांडक, शारदा लखोटिया, सुधा डागा, दिपम लखोटिया, अवनी लखोटिया, शाळेचे मुख्याध्यापक विजय बिहाडे, उपमुख्याध्यापिका ममता श्रावगी, रिंकू अग्रवाल, पर्यवेक्षक नितीन गावंडे,



मालती महल्ले, सुचिता गायकवाड, वैशाली गावत्रे व प्रभुदास नाथे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात बैल व गणपतीच्या मूर्तींचे पूजन करून करण्यात आली. यानंतर उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यशाळेत जयवंत भवाने यांनी विद्यार्थ्यांना बैल व गणपतीच्या मूर्ती तयार करण्याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले.

कार्यशाळेदरम्यान इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी आकर्षक बैल तयार केले, तर इयत्ता सहावी व सातवीच्या विद्यार्थ्यांनी शाडूच्या मातीपासून सुंदर व पर्यावरणपूरक गणेशमूर्ती साकारल्या. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे व कलागुणांचे उपस्थितांनी कौतुक केले.

यावेळी मुख्याध्यापक विजय बिहाडे यांनी विद्यार्थ्यांना गणपती व बैलपोळा सणाचे सांस्कृतिक आणि धार्मिक महत्त्व समजावून सांगितले. तसेच भगवान गणेशाच्या जन्मकथेपासून सार्वजनिक गणेशोत्सवाच्या प्रारंभापर्यंतचा इतिहास विद्यार्थ्यांसमोर उलगडून सांगितला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन छाया गावत्रे यांनी केले, तर भाविका लोणकर यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांनीही या उपक्रमात उत्साहाने सहभाग नोंदवून कार्यशाळेला यशस्वी केले.

## गोगा देवाजीच्या जयघोषाने दुमदुमले आकोट

**अकोट :** बाल्मिकी समाजाचे आराध्य दैवत जाहरवीर गोगाजी महाराज यांचा जन्मोत्सव अर्थात गोगा नवमी पर्व अकोट शहरात पारंपरिक श्रद्धा, भक्तिभाव आणि उत्साहाच्या वातावरणात मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. ढोल- ताश्याचा गजर, डीजेचा दणदणाट आणि आकर्षक छडी - निशानासह निघालेल्या भव्य शोभायात्रेने शहराचे वातावरण भक्तिमय झाले. गोगाजी महाराजांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला.

बाल्मिक नगर येथून पारंपरिक पद्धतीने सुरू झालेली शोभायात्रा कालंका चौक, श्रीनिवास टॉकीज, जयस्तंभ चौक, शिवाजी चौक आदी प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करीत पुढे गेली.

## पावसासाठी मुस्लिम बांधवांची अनवाणी चालत विशेष नमाज व सामूहिक प्रार्थना

प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**हातरूण :** बाळापूर तालुक्यासह हातरूण परिसरात पावसाने दडी मारल्याने खरीप हंगामातील पिकांवर संकट निर्माण झाले आहे. पावसाअभावी शेतकरी चिंतेत असून, पिकांना पाण्याची नितांत गरज भासत आहे. या पार्श्वभूमीव आज दिनांक १२ सिबटेंबर रोजी सकाळी ९ वाजता हातरूण जामा मस्जीद येथुन ऐकत्र होवुन पावसासाठी मुस्लिम बांधवांनी अनवाणी चालत विशेष नमाज अदा करून सामूहिक प्रार्थना केली. परिसरातील मुस्लिम समाजबांधव मोठ्या संख्येने एकत्र आले. पारंपरिक पद्धतीने अनवाणी चालत विशेष नमाज अदा करण्यात आली. यावेळी



अल्लाहकडे रहमत व पावसासाठी मनोभावे दुआ करण्यात आली. परिसरात समाधानकारक पाऊस पडावा, शेतकऱ्यांच्या पिकांना जीवदान मिळावे आणि सर्वत्र सुख-समृद्धी नांदावी, यासाठी सामूहिक प्रार्थना करण्यात आली.हि प्रार्थना जामा मस्जीदचे पेश इमाम अब्दुल रहिम मौलाना यांनी केली आहे. यंदाच्या खरीप हंगामात पावसाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. सोयाबीन, कापूस तसेच इतर खरीप पिकांना आवश्यक पाऊस न मिळाल्याने पिकांच्या वाढीवर परिणाम होत असल्याचे शेतकऱ्यांकडून सांगण्यात येत आहे. पावसाने वेळेत हजेरी लावावी, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत. या सामूहिक प्रार्थनेच्या माध्यमातून धर्म, जात-पंथ बाजूला ठेवून निसर्गाकडे पावसासाठी केलेली आर्त हाक पाहायला मिळाली. पाऊस पडून शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलावा, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# जिल्ह्यात 554 गावांत 'एक गाव, एक गणपती'

## २ हजार ६४३ सार्वजनिक मंडळांत बाप्पाची प्रतिष्ठापना

प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**यवतमाळ** : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील वातावरण भक्तिमय झाले असून, सोमवारी (१४ सप्टेंबर) विघ्नहर्ता गणरायाचे आगमन होणार आहे. यंदा जिल्ह्यात तब्बल ५५४ गावांत 'एक गाव, एक गणपती' उपक्रम राबविला जाणार असून, २ हजार ६४३ सार्वजनिक गणेश मंडळांत बाप्पाची प्रतिष्ठापना होणार आहे. गणेशोत्सव निर्विघ्नपणे पार पडावा यासाठी प्रशासन व पोलिस यंत्रणा सज्ज झाली आहे.

यवतमाळ शहरात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणरायाच्या आगमनाची जोरदार तयारी सुरू आहे. शहरात यंदा गणेशोत्सवाला अधिक भक्तिमय, आकर्षक आणि देखणा करण्यासाठी विविध मंडळांकडून तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. ढोल-ताशांच्या गजरात, पारंपरिक वाद्यांच्या साथीने आणि विविध सांस्कृतिक उपक्रमांतून गणरायाचे स्वागत केले जाणार आहे.

शहरातील प्रमुख मार्गांवर गणेश मंडळांकडून सजावट करण्यात आली असून, गणेशमूर्तींच्या आगमनासाठी मंडळे सज्ज झाली आहेत. ग्रामीण भागातही गणेशोत्सवाची लगबग वाढली आहे. ५५४ गावांत एकच गणपती प्रतिष्ठापित करण्याच्या उपक्रमामुळे सामाजिक एकोपा आणि सामूहिक उत्सवाला चालना मिळणार आहे.

### तीन हजारांवर पोलिसांचा बंदोबस्त

■ गणेशोत्सवाच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी जिल्ह्यात दोन हजारांहून अधिक पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. यामध्ये पोलिस अधिकारी व कर्मचारी, गृहरक्षक दलाचे जवान, राज्य राखीव पोलिस दलाचे जवान तसेच वाहनचालकांचा समावेश आहे. संवेदनशील ठिकाणांवर विशेष लक्ष ठेवण्यात येणार असून, गणेश मंडळांच्या मिरवणुका आणि विसर्जनाच्या वेळी अतिरिक्त बंदोबस्त ठेवला जाणार आहे.

### डीजेविना गणेशोत्सवाचे आवाहन

■ गणेशोत्सवात ध्वनिप्रदूषण टाळण्यासाठी जिल्हा प्रशासन व पोलिसांकडून नागरिकांना डीजेविना गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पारंपरिक वाद्यांना प्राधान्य देत गणेशोत्सवाची संस्कृती आणि परंपरा जपण्यावर भर दिला जात आहे.

# टॉपक्लास योजनेच्या अर्ज पडताळणीस १५ सप्टेंबरपर्यंत मुदत

प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**यवतमाळ** : प्रधानमंत्री यशस्वी उपक्रमांतर्गत ओबीसी, ईबीसी व डीएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या टॉप क्लास योजनेतील पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज पडताळून फॉरवर्ड करण्याचे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाने केले आहे. अर्ज पडताळणीची अंतिम मुदत १५ सप्टेंबर २०२६ आहे.

योजनेसाठी पात्र विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न २.५० लाख रुपयांपेक्षा कमी असणे, विद्यार्थी संबंधित प्रवर्गातील असणे आणि त्याच्याकडे जात प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. संबंधित शाळांनी या बाबींची पडताळणी करावी.

योजनेत इयत्ता ९ वी व १० वीच्या विद्यार्थ्यांना वार्षिक ७५ हजार, तर ११ वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांना १ लाख २५ हजार रुपये आर्थिक मदत दिली जाते.

पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर भरले असून, शाळांनी ते आपल्या लॉगीनमधून फॉरवर्ड करावेत.

मुदतीत अर्ज फॉरवर्ड न झाल्यास विद्यार्थी लाभापासून वंचित राहू शकतो. त्यामुळे मुख्याध्यापकांनी १५ सप्टेंबरपूर्वी सर्व पात्र अर्जांची पडताळणी करून ते फॉरवर्ड करावेत, असे आवाहन सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांनी केले आहे.

# 'यवतमाळचा राजा'च्या आगमनाची जय्यत तयारी, १४ सप्टेंबरला शोभायात्रा

## गुलाल व डीजेमुक्त मिरवणुकीचे आयोजन



प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**यवतमाळ** : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील 'यवतमाळचा राजा'च्या आगमनाची जय्यत तयारी सुरू झाली आहे. नवयुवक गणेश उत्सव मंडळ, मारवाडी चौकच्या वतीने सोमवारी (१४ सप्टेंबर) भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. धार्मिक, सांस्कृतिक आणि पारंपरिक वैभवाचा संगम असलेली ही शोभायात्रा शहरवासीयांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे.

शोभायात्रेला सकाळी १२ वाजता तलाव फैल येथील पेंटर बनकर परिसरातून सुरुवात होईल. शहरातील प्रमुख मार्गांवरून नगरभ्रमण केल्यानंतर मारवाडी चौक येथे शोभायात्रेचा समारोप होणार आहे.

यंदाच्या शोभायात्रेत श्री खाटू नरेश यांचा भव्य दरबार, बाबा आरती, ज्योत, विविध धार्मिक देखावे यांसह देशाच्या विविध भागांतील कलाकार सहभागी होणार आहेत. यवतमाळचे संतोष बँड पथक, अमृतसरचा दिलेर खालसा ग्रुप, कटक (ओडिशा) येथील कलाकार, दिल्ली कार्निव्हल पथक, १० फूट उंच विविध व्यक्तिरेखा, नंदी-भूत-पिशाच्चांचे देखावे, उडते हनुमान, शिव-पार्वती दर्शन, भव्य रथ आणि पारंपरिक ध्वज हे प्रमुख आकर्षण ठरणार आहेत. इंदूर व अमरावती येथील भजन मंडळे तसेच सेठ सेवादेवी ट्रस्ट, इंदूर यांचे विशेष सादरीकरणही होणार आहे. त्यामुळे शोभायात्रेला धार्मिक आणि आध्यात्मिक स्वरूप लाभणार आहे. 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषाने शहर दुमदुमून जाणार आहे. शोभायात्रेचा मार्ग पेंटर बनकर, तलाव फैल, गणेश चौक, गांधी चौक, संतोषी माता चौक, सरदार वल्लभभाई पटेल चौक, टांगा चौक, तहसील चौक, बसस्थानक चौक, दत्ता चौक, जाजू चौक, भाजी मंडई, शनि मंदिर चौक, सरदार चौक मार्गे मारवाडी चौक असा राहणार आहे.

विशेष म्हणजे, मंडळाच्या वतीने शोभायात्रेत गुलालाची उधळपट्टी न करता तसेच डीजेचा वापर न करता मिरवणूक काढण्यात येणार आहे. नागरिकांनी शिस्त, स्वच्छता आणि वाहतूक नियमांचे पालन करून भक्तिभावाने सहभागी व्हावे, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष मनोज पसारी व प्रसिद्धीप्रमुख विजयकुमार बुंदेला यांनी केले आहे.

# डोंगरखर्ड्यात चिमुकल्यांनी अनुभवला तान्हा पोळा

प्रतिनिधी १३ सप्टेंबर



**कळंब** : तालुक्यातील डोंगरखर्डा येथील अंगणवाडी केंद्र क्रमांक ३ मध्ये तान्हा पोळा उत्साहात साजरा करण्यात आला. भारतीय संस्कृती व परंपरेची ओळख बालकांना व्हावी व बैलपोळ्याचे संस्कार त्यांच्या बालमनावर रुजावेत, या उद्देशाने अंगणवाडी सेविका चंद्रकला गणेश पानसे यांनी हा अभिनव उपक्रम राबविला.

कार्यक्रमात पानसे यांनी शेतकऱ्याची पारंपरिक वेशभूषा परिधान केली होती. अंगणवाडीतील चिमुकल्यांनाही शेतकरी तसेच पारंपरिक वेशभूषेत सहभागी करून घेण्यात आले. हातात नक्षीदार लाकडी नंदीबैल घेऊन आलेल्या बालकांनी तान्हा पोळ्याचा आनंद लुटला. या उपक्रमातून बालकांना शेतकरी, बैल आणि कृषी संस्कृतीचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.

### सामाजिक कार्याचीही जोड

■ चंद्रकला पानसे या अंगणवाडीतील शैक्षणिक उपक्रमांसोबतच गेल्या १० ते १२ वर्षांपासून सामाजिक कार्यातही सक्रिय आहेत. अनाथ, दिव्यांग, विधवा महिला व गरजूंच्या मदतीसाठी त्या सातत्याने पुढाकार घेतात. बालकांना शिक्षणासोबत धार्मिक, सांस्कृतिक व नैतिक मूल्यांचे संस्कार देण्याचे कार्यही त्या करीत आहेत. त्यांच्या या उपक्रमाचे पालक व ग्रामस्थांनी कौतुक केले.

# अंदाज समितीच्या दौऱ्यावरून उठले वादळ!

## सरकारी कार्यालये, आश्रमशाळांना खो देऊन 'कंपनी'त धडक; 'हा दौरा नेमका कुणासाठी?'

प्रतिनिधी १३ सप्टेंबर



**झरीजामणी** : आमदार आणि अधिकाऱ्यांचा लवाजमा... दोन दिवसांपासून शासकीय यंत्रणेची सुरू असलेली पळापळ... आणि तालुक्यात विधिमंडळ अंदाज समितीचा दौरा! पण, या संपूर्ण नाट्यात ज्यांच्यासाठी दौरा होता, ते नागरिक आणि शासकीय कार्यालये मात्र 'ताटकळत'च राहिली.

झरीजामणी तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा, आश्रमशाळा, ग्रामपंचायती आणि शासकीय कार्यालयांकडे पूर्णपणे पाठ फिरवून समितीने अचानक खासगी खाणी व सिमेंट कंपनीत धडक मारल्याने, 'या दौऱ्याचा नेमका उद्देश काय?' असा खरमरीत सवाल आता नागरिक विचारू लागले आहेत.

अंदाज समितीच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत अधिकारी, महसूल कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर स्टाफ गेल्या दोन दिवसांपासून मुख्यालयी तळ ठोकून होता. आरोग्य, कृषी, वन विभाग, सार्वजनिक बांधकाम, शिक्षण आणि पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी 'साहेब कधी येतात' याची वाट पाहत होते. मात्र, समितीने एकाही सरकारी कार्यालयाला भेट देणे सोयीस्कर मानले नाही.

उलट, शुक्रवारी (११ सप्टेंबर) दुपारी ४ च्या सुमारास कोणतीही पूर्वसूचना न देता समितीचा ताफा थेट 'बी एस इस्पात' कोळसा खाण आणि 'आरसीसीपीएल' सिमेंट कंपनीच्या दारात जाऊन धडकतो काय! आमदार महोदय कंपनीच्या गेटवर पोहोचण्याच्या अवघ्या २० मिनिटे आधी प्रशासनाला निरोप मिळाल्याने कंपनी व्यवस्थापनाचीही भंबेरी उडाली. समितीने प्लांटमधील तांत्रिक व प्रशासकीय बाबींचा आढावा घेतला नि ताफा पुढे शिरपूरच्या दिशेने रवाना झाला. तालुक्यात शिबला, माथार्जुन, झरी, जुनोनी, पाटण, मार्की व मुकूटबन येथे आदिवासी आश्रमशाळा आहेत. सध्या पोळा सणामुळे आश्रमशाळांतील विद्यार्थी आपापल्या घरी गेले आहेत. शाळा अक्षरशः ओस पडल्या आहेत. गडचिरोलीतील आश्रमशाळेतील विद्यार्थिनीच्या दुर्दैवी मृत्यूनंतर आदिवासी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. असे असताना, शाळांमध्ये विद्यार्थीच हजर नसताना या दौऱ्याचे नियोजन नक्की कुणासाठी केले होते? जर समितीने भेट दिली असती, तर संवाद तरी कुणाशी साधला असता? असे एकापेक्षा एक टोकदार प्रश्न उपस्थित होत आहेत.

नागरिकांच्या समस्या जाणून घेणे, शासकीय योजनांची अंमलबजावणी तपासणे आणि प्रशासकीय यंत्रणेला वठणीवर आणणे हा अंदाज समितीच्या दौऱ्याचा मुख्य हेतू असतो. मात्र, नागरिक, ग्रामपंचायती आणि थेट जनतेशी निगडित यंत्रणेशी कोणताच संवाद न साधता केवळ खासगी कंपन्यांची 'झाडाझडती' घेऊन समिती पुढे निघून गेल्याने, झरी-जामणी तालुक्यात या चक्रावून टाकणाऱ्या दौऱ्याचीच जोरदार चर्चा रंगली आहे.

# ट्रॅक्टर-ट्रॉली चोरीचा छडा; तिघांना अटक

## ३ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त; बाभूळगाव पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी १३ सप्टेंबर



**बाभूळगाव** : शेतातून ट्रॅक्टर-ट्रॉली चोरी करणाऱ्या तिघांना बाभूळगाव पोलिसांनी अटक करून त्यांच्या ताब्यातून दोन चोरीच्या ट्रॅक्टर-ट्रॉलीसह गुन्ह्यात वापरलेला ट्रॅक्टर असा एकूण ३ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

सुरज मोहन पाचभाई रा. राणी अमरावती, आर्यन किसण शेळके आणि विशाल रामू शेळके दोघेही रा. पालोती-नांदुरा, ता. बाभूळगाव अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. मेंढला, ता. कळंब येथील शुध्दोधन चंद्रमणी चहादे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, २५ ऑगस्टच्या रात्री ८ ते २६ ऑगस्टच्या सकाळी ७ वाजेदरम्यान मादणी गावातील मित्र प्रशांत सहारे यांच्या बैलाच्या कोठ्याजवळ उभी केलेली जय कंपनीची जुनी ट्रॅक्टर-ट्रॉली क्रमांक एमएच २९ एके ६५८६ अज्ञात चोरट्याने चोरून नेली होती. याप्रकरणी बाभूळगाव पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४२८/२०२६, भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस निरीक्षक दिपमाला भेंडे यांनी आरोपींचा शोध घेण्याच्या सूचना पथकाला दिल्या. पोलिसांनी चोरीची पद्धत तपासून गोपनीय बातमीदारांच्या माध्यमातून संशयितांचा माग काढला. त्यानंतर पालोती येथून दोन, तर राणी अमरावती येथून एका संशयिताला ताब्यात घेऊन चौकशी केली. चौकशीत तिघांनी बाभूळगाव येथील चोरीची कबुली दिली. तसेच यवतमाळ ग्रामीण पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यातील निळ्या रंगाची एमएच २९ ५९९० क्रमांकाची ट्रॅक्टर-ट्रॉली चोरी केल्याचीही कबुली दिली. पोलिसांनी आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेला सोनालीका कंपनीचा एमएच २९ सीबी ५२९५ क्रमांकाचा ट्रॅक्टर (किंमत २ लाख रुपये), चोरीची एमएच २९ एके ६५८६ क्रमांकाची ट्रॅक्टर-ट्रॉली (२० हजार रुपये) आणि एमएच २९ ५९९० क्रमांकाची ट्रॅक्टर-ट्रॉली (९० हजार रुपये) असा एकूण ३ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलिस अधिकारी अमोल कोळी आणि पोलिस निरीक्षक दिपमाला भेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक रोहित बेंबरे, पोलिस उपनिरीक्षक दिपक आसकर, पोलिस उपनिरीक्षक विक्की जाधव, पोलिस हवालदार निलेश भुसे, पोलिस हवालदार मंगेश कळसकर, पोलिस हवालदार प्रशांत गेडाम आणि पोलिस शिपाई संदिप गोहणे यांनी केली.

# बांधकाम कामगारांच्या हक्काच्या योजनांना 'ब्रेक'

## संकेतस्थळ तातडीने सुरू करण्याची मागणी

प्रतिनिधी १३ सप्टेंबर



**आर्णी** : महाराष्ट्रातील कष्टकरी बांधकाम कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांची ऑनलाइन प्रणाली अचानक ठप्प झाल्याने हजारो पात्र कामगार आणि त्यांचे कुटुंबीय संकटात सापडले आहेत. ही बंद पडलेली ऑनलाइन प्रणाली तातडीने पूर्ववत करून सर्व पात्र कामगारांना त्यांच्या हक्काच्या योजनांचा लाभ देण्यात यावा, अशी घणाघाती मागणी शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख तथा प्रेरणा संस्थेचे अध्यक्ष डॉ. विष्णूभाऊ उकंडे यांनी केली आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने कामगारांच्या पाल्यांसाठी शैक्षणिक शिष्यवृत्ती, उच्च शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य, महिला कामगारांना प्रसूती सहाय्य, मुलींच्या विवाहासाठी मदत, अपघात सहाय्य आणि कामगाराचा मृत्यू झाल्यास कुटुंबाला सानुग्रह अनुदान अशा अनेक महत्त्वाच्या योजना राबविल्या जातात.

मात्र, गेल्या काही दिवसांपासून या योजनांचे ऑनलाइन पोर्टल पूर्णपणे बंद पडले आहे. त्यामुळे नवीन अर्ज दाखल करणे अशक्य झाले असून हजारो कामगारांचे प्रस्ताव धूळ खात पडून आहेत. विशेषतः ऐन शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे अर्ज भरता येत नसल्याने कामगारांच्या मुला-मुलींचे मोठे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

■ "बांधकाम कामगार हा राज्याच्या पायाभूत विकासाचा खरा कणा आहे. त्याच्या अहोरात्र कष्टातूनच राज्याची प्रगती उभी राहत आहे. अशा वेळी तांत्रिक किंवा प्रशासकीय कारणांचे तुणतुणे वाजवून त्यांच्या हक्काच्या योजनांना ब्रेक लावणे अत्यंत अन्यायकारक आहे," अशा शब्दांत डॉ. उकंडे यांनी आपला संताप व्यक्त केला.

# आकाश पाळण्यात महिलेच्या केसांसह डोक्याची निघाली चामडी

## बेरिंगमध्ये केस अडकल्याने महिला गंभीर जखमी

प्रतिनिधी १३ सप्टेंबर



**तान्हा पोळ्याच्या यात्रेत थरारक दुर्घटना**

**महागाव** : तान्हा पोळ्यानिमित्त फुलसावंगी येथील पुणेश्वर मंदिराच्या पायथ्याशी आयोजित यात्रेत शुक्रवारी दुपारी आकाश पाळण्यातून पडलेल्या गंभीर अपघाताने खळबळ उडाली. पाळण्यात बसलेल्या महिलेचे केस यंत्रणेच्या बेरिंगमध्ये अडकल्याने तिच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. या दुर्घटनेत केसांसह डोक्याची चामडी निघाल्याची धक्कादायक घटना घडली.

फुलसावंगी येथील बाली मारोती टाळीकोटे (२५) या शुक्रवारी दुपारी आकाश पाळण्यात बसल्या होत्या. सुमारे तीन वाजताच्या सुमारास पाळणा सुरू असताना अचानक त्यांचे केस बेरिंगमध्ये अडकले. पाळणा सुरू असल्याने काही क्षणांतच केस जोराने ओढले गेले. त्यामुळे त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. दुर्घटना लक्षात येताच घटनास्थळी उपस्थित सहाय्यक पोलिस निरीक्षक सुनील अंभुरे आणि जमादार सुहास कायटे यांनी नागरिकांच्या मदतीने तत्काळ पाळणा थांबविला. जखमी महिलेला पाळण्यातून बाहेर काढून तातडीने रुग्णवाहिका बोलावण्यात आली. त्यानंतर त्यांना उपचारासाठी पुसद येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती आहे.

तान्हा पोळ्याच्या यात्रेनिमित्त मोठ्या संख्येने भाविक उपस्थित असताना ही दुर्घटना घडल्याने यात्रेतील मनोरंजनाच्या साधनांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आकाश पाळण्याची यंत्रणा, बेरिंग तसेच इतर सुरक्षा उपायांची योग्य तपासणी करण्यात आली होती का, याबाबत आता प्रश्न उपस्थित होत आहे.

# अपघातग्रस्ता च्या मदतीला धाऊन गेले माजी आमदार उत्तम इंगळे

प्रतिनिधी १३ सप्टेंबर



**उमरखेड**: राजकारण म्हणजे केवळ पद, सत्ता आणि पक्षीय कार्यक्रम नव्हे,तर संकटाच्या क्षणी सामान्य माणसाच्या मदतीला धावून जाणे म्हणजे खरे लोकनेतृत्व, याची प्रचिती उमरखेडचे माजी आ. उत्तम इंगळे यांनी पुन्हा एकदा दिली.

भाजपाच्या प्रदेश कार्यकारिणीच्या बैठकीसाठी पुण्याकडे जात असताना उमरखेड खडका-गुंज-पुसद मार्गावर शिरपूर गावाजवळ अपघात झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. अपघातात एक व्यक्ती गंभीर जखमी अवस्थेत रस्त्यावर पडल्याचे दिसताच इंगळे यांनी क्षणाचाही विलंब न करता आपला प्रवास थांबवला. प्रदेश कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक, पक्षाची जबाबदारी आणि पुढील प्रवासाचे नियोजन असूनही त्यांनी राजकीय कार्यक्रमापेक्षा जखमी व्यक्तीचा जीव आणि माणुसकी च्या कर्तव्याला जोपासून माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागले पाहिजे हे कर्तव्य जोपासून तातडीने वाहनाची व्यवस्था करून जखमी व्यक्तीला उपचारासाठी पुसद येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. संकटाच्या वेळी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनीही मदतीसाठी पुढे येणे आवश्यक असल्याचा संदेश या घटनेतून देण्यात आला. यावेळी भाजपा शहराध्यक्ष अतुल खंदारे, युवा मोर्चा अध्यक्ष पवन मेंढे,आदित्य शिंदे यांच्यासह नागरिकांची उपस्थिती होती. राजकारणात पद मिळवणे सोपे असू शकते; मात्र जनतेच्या संकटाच्या क्षणी स्वतःचा कार्यक्रम बाजूला ठेवून मदतीसाठी धावून जाणे हीच खरी लोकसेवेची कसोटी आहे. इंगळे यांनी दाखविलेल्या या संवेदनशील भूमिकेमुळे त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये आणि नागरिकांमध्ये सकारात्मक प्रतिक्रिया उमटत आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती

रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com




# दर्यापूर तालुका कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करा

## महाराष्ट्र शेतकरी संघटनेची मागणी

प्रतिनिधी १३ सप्टेंबर



**दर्यापूर :** दर्यापूर तालुक्यात पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे दर्यापूर तालुका कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करावा, अशी मागणी महाराष्ट्र शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आली.

महाराष्ट्र शेतकरी संघटनेचे अमरावती ग्रामीण जिल्हाध्यक्ष पार्थ प्रफुल्लराव लोडम व जिल्हा उपाध्यक्ष राज सं. गुजराथी यांच्या नेतृत्वाखाली दर्यापूर तहसीलदार तसेच तालुका कृषी अधिकारी यांना यासंदर्भात निवेदन देण्यात आले.

पावसाअभावी सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद यांसह विविध पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. बाधित पिकांचे तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई व पीकविम्याची मदत देण्यात यावी, तसेच शेतकऱ्यांसाठी तातडीने आर्थिक मदत व विशेष दुष्काळी पॅकेज जाहीर करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

यावेळी पार्थ रुमाले, करण चक्रे, ओम येवले, सोहम घुरडे, अधिराज पाचडे, मेहेर ठाकरे, सुजित दांडगे, सोपान शिरसागर आणि रोहित घरडे यांच्यासह महाराष्ट्र शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दर्यापूर तालुक्यातील शेतकऱ्यांची परिस्थिती लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने योग्य ती कार्यवाही करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र शेतकरी संघटनेने केली आहे.

# स्थानिक गुन्हे शाखा अमरावती (ग्रा) यांची कार्यवाही

## सोनोरा भिलटेक येथील घरफोडीचा पर्दाफाश

प्रतिनिधी १३ सप्टेंबर



**अमरावती :** स्थानिक गुन्हे शाखा अमरावती (ग्रा) यांनी कारवाई करून सोनोरा भिलटेक येथील घरफोडीचा पर्दाफाश केला.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी चोरी घरफोडी, जबरी चोरी, दरोडाचे गुन्हे स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामिण येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन करून सदर गुन्हे उघड करण्याबाबत सुचना निर्गमीत केल्या होत्या.

त्यानुसार स्था. गु. शाखा अमरावती ग्रा च्या पथकाने सोनोरा येथील घरफोडी समांतर तपास करत असताना दि. 04/03/2026 ते 06/03/2026 दरम्यान ग्राम सोनोरा भिलटेक, ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती येथे फिर्यादी यांच्या घरी त्यांची आजी एकटी असताना 3 अज्ञात इसमांनी घराच्या मागील भिंतीवरून घरात प्रवेश करून कपाटातील सोन्याचे दागिने चोरी करून नेले होते. याबाबत पोलीस स्टेशन चांदूर रेल्वे येथे अप.क्र. 77/2026, कलम 305 (अ), 331(4) BNS अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू असताना तांत्रिक माहिती, गोपनीय बातमीदारांकडून मिळालेली माहिती तसेच उपलब्ध पुराव्यांच्या आधारे गुन्ह्यातील आरोपी निष्पन्न करण्यात आले. गुन्ह्यातील आरोपी चेतन नरेंद्र चव्हाण, वय २५ वर्षे, याचा शोध घेऊन त्यास भोसरी MIDC, पिंपरी-चिंचवड, पुणे येथून शिताफीने ताब्यात घेण्यात आले. त्याची गुन्ह्याच्या अनुषंगाने चौकशी केली असता त्याने इतर साथीदारांच्या संगनमताने सदर चोरी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर गुन्ह्यातील आरोपी क्र.2 ते 4 यांना चांदूर रेल्वे येथून ताब्यात घेण्यात आले. चोरी केलेले सोने आरोपी रोहित रवी इमले याने सोनाराकडे विक्री करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, विना पावतीचे सोने स्वीकारण्यास सोनाराने नकार दिल्याने चोरीच्या सोन्याचा गोळा तयार करण्यात आला होता.

# रेतीची चोरटी अवैध वाहतुक करणारा डंपर जप्त

प्रतिनिधी १३ सप्टेंबर



**अमरावती :** रेतीची चोरटी अवैध वाहतुक करणारा डंपर जप्त केला आहे. स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीण यांची धडक कारवाई केली. आरोपी नाव गंगाधर कृष्णाजी कवडेती वय ३८ वर्ष, रा. कुराड ता. वरूड जि. अमरावती, राजेश अंतुस उईके वय- ३२ वर्ष रा. पुसला ता. वरूड जि. अमरावती., फरार आरोपी दिपक काळे रा. पुसला ता. वरूड जि. अमरावती असे आहे.

निकेतम कदम, पोलीस अधीक्षक यांनी 'ऑपरेशन कवच' अंतर्गत अमरावती ग्रामीण जिल्ह्यातील अवैधरित्या विनापरवाना रेतीची (गौन खनिज) चोरटी वाहतुक करणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीण येथील अधिकारी व अंमलदार यांना सुचना निर्गमीत केल्या होत्या. त्याअनुषंगाने दिनांक १२/०९/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीण येथील स्थानिक गुन्हे शाखेचे पथक, पोलीस स्टेशन शेघाट हद्दीत विनापरवाना गौन खनिज रेती वाहतुकीवर कार्यवाही करणेकामी पेट्रोलींग करीत असतांना गोपनिय बातमीदारामार्फत खबर मिळाली की, ग्राम पुसला मार्गे शेघाट कडे एक रेतीचा ट्रक येत आहे. अशा माहितीवरुन पथकाने पोलीस स्टेशन शेघाट हद्दीतील सातनूर चौफुली येथे नाकाबंदी करीत असतांना समोरुन एक टाटा कंपनीचा पांढऱ्या रंगाचे कॅबीन असलेला ट्रक येतांना दिसला. त्यास हाताचे ईशाऱ्याने थांबवुन चालकाचे नाव विचारले असता त्याने आपले नाव गंगाधर कृष्णाजी कवडेती वय ३८ वर्ष, रा. कुराड ता. वरूड जि. अमरावती असे सांगीतले तसेच चालकाचे बाजुला बसलेल्या इसमास त्याचे नाव विचारले असता राजेश अंतुस उईके वय ३२ वर्ष रा.पुसला ता. वरूड जि. अमरावती असे सांगीतले. वरुन सदर ट्रकची पाहणी केली असता, ट्रक मध्ये अंदाजे सात ब्रास (०७) पांढरी रेती आढळुन आली. सदर अवैध रेती वाहतुकीबाबत रॉयल्टी/परवाना मागीतला असता, कोणत्याही प्रकारचा रॉयल्टी/परवाना नसल्याचे चालकाने सांगीतले. वरुन रेती मालाबाबत अधिक विचारपुस केली असता, ट्रक मालक दिपक काळे रा. पुसला ता. वरूड जि. अमरावती यांचे सांगणेवरुन रेतीची चोरटी वाहतुक केल्याचे सांगीतले. वरुन आरोपीतांचे ताब्यातुन अंदाजे सात ब्रास (०७) पांढरी रेती कि.अं. ५९,५००/-रु व एक टाटा सिगना कंपनीचा ट्रक कि.अं.३२,००,०००/-रु असा एकुण ३२,५९,५००/-रु चा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करून सदर मुद्देमाल व आरोपी पुढील कार्यवाही करीता पोलीस स्टेशन शेघाट यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

# युवा स्वाभिमान पार्टीचे नामदार शिवेंद्रराजे भोसले यांना निवेदन

प्रतिनिधी १३ सप्टेंबर



**अमरावती:** अमरावती शहरातील महत्त्वाची अपूर्ण रस्त्यांची कामे पूर्ण करण्यासाठी निधी मंजूर करून कामे पूर्ण करण्याबाबत. युवा स्वाभिमानी पार्टीचे नेते सुनील राणा यांच्या नेतृत्वात सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांना निवेदन देण्यात आले. बडनेरा विधानसभा मतदारसंघांतर्गत अमरावती शहरातील नागरिकांच्या दळणवळणाच्या दृष्टीने महत्त्वाची असलेली खालील रस्त्यांची कामे अपूर्ण आहेत. निंभोरा उड्डाणपूल ते डॉ. श्री. मनोज निचत यांच्या रुग्णालयापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता,. खंडेलवाल ते नवाथे चौकपर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता. , यवतमाळ टी-पॉईंट रिंग रोड ते अकोला एक्सप्रेस-वेपर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता. सदर रस्ते वाहतूक व नागरिकांच्या दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असल्याने, वरील कामांसाठी आवश्यक निधी शासन स्तरावरून मंजूर करून कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत संबंधित यंत्रणेस आवश्यक निर्देश देण्यात यावेत, ही विनंती. निवेदन देताना युवा स्वाभिमान पार्टीचे मार्गदर्शक सुनिल राणा यांच्या नेतृत्वात उपस्थित उपमहापौर सचिन भेंडेसह सर्व नगरसेवकांनी शासकिय विश्रामगृहामध्ये महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी शिवेंद्रराजे भोसले यांनी निवेदनासंदर्भात सकारात्मक विचार करुन होकारार्थी शब्द देऊन लवकरात लवकर वरील विकास कामासंदर्भात निधी मंजुर करुन कामे पुर्ण करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी जिल्हाअध्यक्ष प्रकाश साबळे, महिला जिल्हाअध्यक्षा सोनाली नवले, YSP मनपा गटनेते नाना आमले, चिखलदरा नगरसेवक आल्हाद कलोती, नगरसेविका अर्चना पांडे, प्रियंका पाटने, मिरा कांबळे, अविनाश काळे, उमेश ढोणे, अशोक पांडे, संदिप कांबळे, घटारे साहेब आदि उपस्थित होते.

# भरत नगर येथील रस्ता बांधकाम भूमिपूजन उपमहापौर सचिन भेंडे यांच्या हस्ते



प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**अमरावती :** विकासात्मक बांधणीसाठी कार्यसम्राट आमदार रवी भाऊ राणा माजी . खा. नवणीत राणा यांच्या मार्गदर्शनात अमरावती महानगर पालिकेचे उपमहापौर सचिन भेंडे यांच्या प्रयत्नाने साई नगर प्रभागातील विविध भागात विकास कामे होत असून आज भरत नगर येथील रस्ता बांधकाम भूमिपूजन करण्यात आले असून असाच निरंतर विकास सुरू राहील असे आश्वासन त्यांनी दिले सदर प्रसंगी देवा शेंडे, अमोल इंगळे , प्रशांत कावरे, श्याम कथे, प्रमोद चिंचमलातपुरे, संजय रागुवांशी, दिलीप पानझडे, प्रशांत साखरे, जगदीश सोमवंशी, सतीश गुल्हणे, पराते सर, ठोकळ साहेब, काकडे काका, भानुसे मॅडम, करडे मॅडम, सौ, वरघट, तथा प्रभागातील असंख्य नागरिक, माता भगिनी, तरुण मंडळी उपस्थित होते

# जनतेची दिशाभूल करून स्वत:च्या सरकारमध्ये झालेली चूक लपवणे हा भाजपचा नित्यक्रम

## शिवराय कुलकर्णी यांचे यशोमतीताई ठाकूर यांच्यावरील आरोपावर कॉंग्रेसचे प्रत्युत्तर

प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**अमरावती :** दिनांक २४/०८/२०२६ रोजी जिल्हा स्त्री रुग्णालय, अमर वती येथील NICU मध्ये झालेल्या व्हेन्टिलेटरचा स्फोट होऊन लागलेल्या आगीच्या दुर्घटनेत तीन नवजात बालकांचा मृत्यू झाला होता. या

गंभीर प्रकरणाचा चौकशी अहवाल चौकशी समितीने शासनास सादर केला असून यात व्हेंटिलेटर खरेदी करणारी शिल्लर कंपनीला ब्लॅक लिस्टेड करून अधिकाऱ्यांवर निलंबनाची कार्यवाही केली आहे. परंतु यात भाजप प्रदेश प्रवक्ते श्री. शिवराय कुलकर्णी यांनी व्हेंटिलेटर ची खरेदी उद्धव ठाकरे आणि यशोमती ठाकूर यांच्याच कार्यकाळातील ! यशोमतीताई झूट की गुंज थांबवा ! असे आरोप केले होते. याच आरोपांना कॉंग्रेसने प्रत्युत्तर दिले आहे.

अमरावती येथील नवजात शिशु अतिदक्षता विभागात (NICU) व्हेंटीलेटरचा स्फोट होऊन झालेल्या अग्नितांडवामध्ये तीन निष्पाप नवजात बालकांचा होरपळून दुर्दवी मृत्यू झाला. या प्रकारांच्या चौकशी अहवालात

सदोष व्हेंटिलेटर आणि अग्निशामण यंत्रणेचा दोष असल्याचे चौकशी समितीने स्पष्ट केले. शिल्लर कंपनीचे व्हेंटिलेटर हे सन २०२२ मध्ये राज्य शासनाने खरेदी करून राज्यातील बहुतांश जिल्ह्यामध्ये पुरवठा केले होते. सदर व्हेंटिलेटर हे तत्कालीन पालकमंत्री ऍड यशोमातीताई ठाकूर जिल्ह्याच्या पालकमंत्री असताना घेण्यात आले आहे.

असा आरोप भाजप प्रदेश प्रवक्ते शिवराय कुलकर्णी यांनी केला होता. परंतु प्रत्यक्षात मात्र या व्हेंटीलेटरची खरेदी राज्य शासनाने खरेदी केली होती. यात पालकमंत्री तसेच जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीचा संबंध देखील येत नाही. हे व्हेंटीलेटर खरेदी करीत असताना १० लक्ष रुपये किमतीचे व्हेंटीलेटरच २२ लक्ष रुपयाला भाजपच्याच कार्यकाळात खरेदी केल्याचे देखील निदर्शनास आले आहे. य शिल्लर कंपनीला भाजप सरकारचे अभय असल्याने देखील या निमित्ताने निदर्शनास आले आहे.

परंतु केवळ कुठल्याही गोष्टीचा राजकारण करून खोट बोल पण रेटून बोल हा भाजपचा नाकर्तेपणा असून स्वताचे अपयश झाकून नेहमीप्रमाणे कॉंगेसवर आणि ऍड यशोमती ठाकूर यांच्यावर आरोप करण्याचा हा प्रकार आहे. यात कोणतेही तथ्य नाही या प्रकरणी राजकारण न करता आरोग्य व्यवस्था सुधारणेवर भाजपने लक्ष द्यावे. असे बबलू शेखावर, अध्यक्ष शहर कॉंग्रेस कमेटी, विलास इंगोले, विरोधी पक्षनेता मनपा अमरावती यांनी प्रत्युत्तर दिले.

# मारवाडी लाईन परिसरात वरली-मटका जुगारावर पोलिसांची धाड

## चौघे जुगार खेळताना ताब्यात; ३ हजार ७१० रुपयांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी १३ सप्टेंबर



**चांदूर रेल्वे :** शहरातील मारवाडी लाईन परिसरात सार्वजनिक ठिकाणी सुरू असलेल्या वरली-मटका जुगारावर चांदूर रेल्वे पोलिसांनी धाड टाकून चौघांवर कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी वरली-मटका जुगाराच्या चिठ्ठ्या तसेच रोख रक्कम असा एकूण ३ हजार ७१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलिसांचे पथक डीओ ड्युटीदरम्यान परिसरात पेट्रोलिंग करीत असताना मारवाडी लाईन परिसरातील सार्वजनिक ठिकाणी काही इसमांकडून पैसे घेऊन वरली-मटका जुगार सुरू असल्याची गुप्त माहिती मिळाली. माहितीच्या आधारे पोलिसांनी सदर ठिकाणी छापा टाकला. यावेळी चंदन उर्फ बल्ला सुरेश मारोटे (रा. मारवाडी लाईन, चांदूर रेल्वे), पुरुषोत्तम भगवानजी फरकुंडे (रा. डांगरीपुरा, चांदूर रेल्वे), राहुल रमेशराव केणे (रा. आमला विश्वेश्वर, ता. चांदूर रेल्वे) आणि चंद्रकांत नामदेव यादव (रा. शिवाजीनगर, चांदूर रेल्वे) हे वरली-मटका जुगार खेळतांना आढळून आले. पोलिसांनी जुगाराची कारवाई करीत त्यांच्या ताब्यातून १ ते १० वरली-मटका जुगाराच्या चिठ्ठ्या व रोख रक्कम असा एकूण ३ हजार ७१० रुपयांचा जुगाराचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी नमूद आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२(अ) सह कलम ४९ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे. ही कारवाई ठाणेदार मंगेश मोहोड यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय नंदलाल लिंगोट तसेच पोलीस कॉन्स्टेबल भागवत कासार यांनी केली.

# अभ्यासा इंग्लिश स्कूलतर्फे विद्यार्थ्यांनी बनवले शाडू मातीचे गणपती




**अमरावती :** गणेश उत्सव साजरा करताना पर्यावरणाचा अभ्यास करणे ही एक काळाची गरज आहे असे प्रतिपादन अभ्यासा शाळेच्या मुख्याध्यपिका कांचनमालताई गावंडे यांनी केलं मातीचा गणपती निसर्गाशी बांधिलकी या उपक्रमांतर्गत शाळेनी मातीच्या मूर्तीची प्रतिस्थापना करण्याचे आव्हान केलं आहे शाळेतील विद्यार्थी व समाजात पर्यावर्नाबद्दल जागृती व्हावी, तसेच प्लास्टिक प्रदूषण टाळण्यासाठी हार्दिक उपक्रम राबवण्यात आला आहे तसेच वृक्षरोपण, जलसंवर्धन, प्रदूषणाला आळा, ऊर्जासंवर्धन, या उपक्रमाबरोबर पर्यावर्णपूरका गणपती ही संकल्पना महत्वाची ठरणार आहे यासाठी विद्यार्थ्यांनी पंचवटी येथे मातीचे गणपती विक्री साठी उपलब्ध सुद्धा करून दिले आहे या कारणाने विद्यार्थ्यांना मार्केटिंग स्किल सुद्धा मुलांमध्ये रुजवता येईल हा या मागचा खरा उद्देश आहे गणपती स्थपणा आपल्या महाराष्ट्रामध्ये खूप मोठा उत्सव साजरा केला जातो तसेच लोकमान्य टिळकानी हा उत्सव सर्व धार्मिक लोक एकत्र यावे यासाठी त्यांनी हा उत्सव साजरा केला.

# विद्यापीठात 15 सप्टेंबर रोजी श्रीचक्रधरस्वामी अवतार दिनानिमित्त विशेष व्याख्यान

**अमरावती :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या महानुभाव अध्यासन केंद्र आणि सर्वज्ञ सेवा महिला मंडळ, हर्षराज कॉलनी यांच्या संयुक्त विद्यमाने 'श्रीचक्रधरस्वामी अवतार दिनानिमित्य विशेष प्रबोधन व्याख्यानाचे आयोजन मंगळवार दिनांक 15 सप्टेंबर रोजी दुपारी 3 वाजता विद्यापीठ परिसरातील डॉ. श्रीकांत जिचकर मेमोरियल रिसर्च सेंटर सभागृहात करण्यात आले आहे. या व्याख्यानमालेचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे भूषविणार असून , सांगोला (जि. सोलापूर) येथील प्रख्यात वक्ते ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज बंडगर हे आपल्या ओघवत्या वाणीने श्रीचक्रधरस्वामींच्या जीवनकार्यावर व विचारांवर




विस्तृत प्रबोधन करणार आहे. या प्रसंगी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. व्ही.एम. मेटकर, श्री. सुभाषराव पावडे, डॉ. अमोल ठाकरे आणि डॉ. अण्णा वैद्य यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तरी आयोजित या कार्यक्रमाला सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे ,अशी विनंती विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे , महानुभाव अध्यासनकेंद्राचे समन्वयक डॉ. महंत सोनपेठकर, आणि सर्वज्ञ सेवा महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. प्रतिमा भूगुल यांनी केली आहे.

# कावड यात्रेकरूंचे जल्लोषात स्वागत; शिवभक्तांना उसळ-फराळाचे वाटप

प्रतिनिधी १३ सप्टेंबर



**दर्यापूर :** पवित्र श्रावण महिन्यानिमित्त सुरू असलेल्या कावड यात्रेदरम्यान शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातर्फे कावड यात्रेकरूंचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. आमदार गजानन लवटे व युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित या उपक्रमात शिवभक्तांना उसळ-फराळाचे वाटप करण्यात आले. या सेवा उपक्रमाला शिवभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.।कावड यात्रेत सहभागी झालेल्या शेकडो शिवभक्तांचे पुष्पहार घालून व "हर हर महादेव"च्या जयघोषात स्वागत करण्यात आले. यात्रेकरूंना अल्पोपहारासह उसळ-फराळाचे वाटप करून त्यांच्या सेवेसाठी शिवसैनिकांनी विशेष परिश्रम घेतले. कावड यात्रेच्या निमित्ताने धार्मिक वातावरणात भक्ती, सेवा आणि सामाजिक बांधिलकीचा सुंदर संगम पाहायला मिळाला.

या वेळी उन्हाचा पारा चांगलाच वाढलेला असतानाही शिवभक्तांच्या उत्साहात कोणतीही कमी दिसून आली नाही. भर उन्हातही भाविकांनी भगवान शंकराच्या नामस्मरणात कावड यात्रा सुरू ठेवली. यात्रेकरूंची सेवा करण्यासाठी शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शिवसैनिक दिवसभर कार्यरत होते.

या स्वागत व सेवा उपक्रमात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पदाधिकारी, शिवसैनिक आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा शिवभक्तांच्या सेवेसाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे भाविकांनी कौतुक करत आयोजकांचे आभार व्यक्त केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
रविवार दि. १३ सप्टेंबर २०२६ http://epaper.citynewssuperfast.com







# अधिकाऱ्यांना भ्रष्टाचाराचा छंद...

# आर्थिक देवाण-घेवाणसाठी 'क्युआस' मशीनी पाडल्या बंद !

## * नागरिकांना आर्थिक भुर्दंड * भ्रष्टाचारासाठी काहीही * बंद मिशनमुळे नागरिकांची तारांबळ

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

जिल्हाधिकारी कार्यालयासह प्रत्येक तहसील कार्यालयात नागरिकांना वेळेवर कागदपत्र मिळावे यासाठी क्युआस मशिनही बसविण्यात आल्या आहेत. परंतु या मशिनमुळे भूमिअभिलेख व तहसील कार्यालयातील अधिकाऱ्याचे आर्थिक आवक कमी झाली. नागरिकांचे कामे सुलभ होवू लागले. मात्र नागरिकांना त्रास देण्याचा वसा घेतलेल्या विघ्नसंतोषी कर्मचाऱ्यांनी मिशनच बंद पाडल्याचा प्रकार समोर आला आहे. यावरून पैशासाठी अधिकारी व कर्मचारी काहीही करतात.



जिल्ह्यातील तहसील कार्यालयातील क्यूआस मशीन बंद पडल्याने तालुक्यातील नागरिकांना अडचणीला सामोरे जात कार्यालयातील अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांची मनधरणी करावी लागत असून दिवसभर या विभागाच्या दारात गर्दी दिसून येते आहे. मनधरणी करूनही पैसे दिवूनही अधिकारी व कर्मचारी अगावू पैशाची मागणी करत आहेत. नागरिकांना कोणत्याही वेळी लागणारे सातबारा, कोतवाल बुकाची नक्कल, फेरफार, आठ अ आदी कागदपत्रे ताबडतोब मिळावेत या साठी जिल्हाधिकारी यांच्या प्रयत्नाने जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयात क्यूआस मशीन (ए टि डि एम) बसवण्यात आले . याचा फायदा नागरिकांना होत असे. या मशीन मुळे अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यावर ताण कमी झाला होता. मात्र गैरमार्गाने मिळणारा पैसाही बंद झाला होता. नागरिकांना त्रास देण्याची सवय असणाऱ्या कर्मचाऱ्यांना हे पाहविल्या गेले नाही. त्यातील काही कर्मचाऱ्यांनी बुध्दी लढवून जिल्ह्यातील मशीन बंद पाडल्या आहेत. मशीन बंद असल्यामुळे अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी पुन्हा नागरिकांकडून कागदपत्रासाठी वसूली अभियांन सुरू केले आहे. या मशीनमुळे नागरिकांच्याही पैशाची व वेळेची बचत होत असे परंतु गेल्या काही वर्षापासून जिल्हाधिकारी कार्यालयासह तहसील कार्यालयातील ही मशीन बंद झाल्याने नागरिकांची अडचण होत आहे. फेरफार, कोतवाल बुकाची नक्कल आदी कागदपत्र मिळवण्यासठी तीन ते सात दिवस लागत आहेत. तसेच नागरिकांचा वेळ व पैसाही जास्तीचा खर्चल्या जात आहे. कागदपत्रे लवकर मिळवण्यासाठी 'चिरीमिरी'ची देवाण घेवाण करावी लागते अशी चर्चा नागरिकात आहे. तरी संबंधितांनी यामशीनच्या दुरुस्तीकडे लक्ष्य देऊन ही मशीन सुरू करून नागरिकांचा त्रास कमी करावा अशी मागणी नागरिकांना मधून होत आहे. भूमीअभिलेख कार्यालयात फेरफार नकल यासाठी सर्वसामान्यांना त्रास सहन करावा लागत असून वारसा हक्काच्या नोंदीसाठी वर्षवर्ष चकरा माराव्या लागत आहेत.

## बंद पडलेल्या एटीडीएम मशीन सुरू करा - बंडू शिंदे

वाशीम : शेतकरी व सर्वसामान्य नागरीकांना सरकारी व खाजगी कामासाठी लागणारे सातबारा, आठ अ यासह इतर कागदपत्रे सहजगत्या मिळावी म्हणून जिल्हाधिकारी कार्यालय, तहसिल कार्यालय व कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयात सुरु केलेली संगणकीकृत एटीडीएम मशीन यंत्रणा आजघडीला विविध कारणामुळे गेल्या काही वर्षापासून बंद अवस्थेत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांसह नागरीकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असून ही कागदपत्रे मिळत नसल्यामुळे त्यांची इतर कामे रखडली आहेत. सदर एटीडीएम मशीन त्वरीत सुरु करुन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी सामाजीक कार्यकर्ते बंडु शिंदे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देवून केली आहे. निवेदनात शिंदे यांनी नमूद केले आहे की, डिजीटल सातबारा, आठ अ चे जुने व नवीन नमुने त्वरीत मिळण्यासाठी शासनाने जिल्हाधिकारी कार्यालय, तहसिल कार्यालय व कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरामध्ये संगणकीकृत एटीडीएम मशीन लावल्या आहेत. काही दिवस ह्या मशीनी सुरु होत्या. परंतु गेल्या काही महिन्यापासून काही मशिनी बंद, बिघडलेल्या किंवा कोरोना संसर्ग होवू नये म्हणून बंद अवस्थेत आहेत. सदर मशीन बंद असल्यामुळे विविध कागदपत्रे काढण्यासाठी शेतकरी व सर्वसामान्य नागरीकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे संबंधीतांना शासकीय कामासाठी लागणारी जुनी व नविन कागदपत्रे काढता येत नाहीत. सर्वसामान्यांना होणारा त्रास पाहता संबंधीत ठिकाणी असलेल्या ह्या एटीडीएम मशीनी त्वरीत सुरु करावी अशी मागणी शिंदे यांनी निवेदनाव्दारे प्रशासनाला केली आहे.

## थोडक्यात

### विभागीय लोकशाही दिन १५ सप्टेंबर रोजी

**१४ सप्टेंबरला सुट्टी असल्याने बदल**

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •




शासन सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक क्र.प्रसुधा. २०११/ प्र.क्र.१८९/११/१२-अ, दि. २६ सप्टेंबर २०१२ अन्वये दर महिन्याला दुसऱ्या सोमवारी विभागीय लोकशाही दिन तसेच संदर्भ क्र. २ मधील शासन निर्णयान्वये महिला विभागीय लोकशाही दिनाचे आयोजन सुध्दा प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येते. तसेच दि. १४ सप्टेंबर, २०२६ चे दुसऱ्या सोमवारला श्री. गणेश चतुर्थी असल्यामुळे सार्वजनिक सुट्टी आहे. शासन परिपत्रक दि. २६ सप्टेंबर २०१२ मधील मुद्दा क्र. ५.१ नुसार लोकशाही दिनाचे दिवशी शासकीय सुट्टी असल्यास, त्यानंतर येणारा कामकाजाचा दिवस 'लोकशाही दिन' म्हणून पाळण्यात येईल अशी तरतूद आहे. सबब विभागीय लोकशाही दिन व महिला लोकशाही दिनाचे आयोजन दि. १४ सप्टेंबर, २०२६ ऐवजी १५ सप्टेंबर, २०२६ (मंगळवार) रोजी आयोजित करण्यात येत असल्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### मनमानी भाडे आकारणाऱ्या खासगी बसेसवर होणार कारवाई

**वाशिम आरटीओकडून विशेष तपासणी मोहीम सुरू**
**तक्रारीसाठी ई-मेल आयडी जाहीर**

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

गणेशोत्सव २०२६ च्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची होणारी आर्थिक फसवणूक रोखण्यासाठी आणि खासगी बस वाहनांच्या मनमानी भाडेवाढीवर वेसण घालण्यासाठी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वाशिम आरटीओ ?क्शन मोडवर आले आहे. खासगी कंत्राटी प्रवासी वाहनांवर लक्ष ठेवण्यासाठी ११ सप्टेंबर ते २६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत राज्यभरात विशेष तपासणी मोहीम राबवण्यात येत आहे.

भाडेवाढीबाबत शासनाचे नियम शासन निर्णयानुसार खासगी कंत्राटी प्रवासी वाहनांना संबंधित मार्गावरील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या एसटी बस भाड्यापेक्षा कमाल ५० टक्क्यांपेक्षा जास्त भाडे आकारण्यास सक्त मनाई आहे. त्यामुळे सर्व खासगी बस वाहतूकदारांनी शासनाने ठरवून दिलेल्या कमाल मर्यादेतच भाडे आकारणी करावी, असे स्पष्ट निर्देश परिवहन विभागाने दिले आहेत.तपासणी मोहिमेतील प्रमुख बाबीमोहिमेदरम्यान उप प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांचे पथक रस्त्यावर उतरून वाहनांची कडक तपासणी करणार आहे. यात प्रामुख्याने खालील मुद्द्यांवर लक्ष केंद्रित केले जाईल: ङ भाडे तफावत: ऑनलाईन आरक्षित तिकिटे आणि प्रत्यक्ष आकारलेले भाडे यामध्ये तफावत आढळल्यास कारवाई. ङ सुरक्षा व तांत्रिक तपासणी: वाहनातील आपत्कालीन यंत्रणा, अग्निशामक यंत्रणा, पॅनिक बटण, वाहनाचे फिटनेस प्रमाणपत्र. ङ इतर नियमभंग: क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशांची वाहतूक करणे आणि परवान्यातील अटींचा भंग करणे.प्रवाशांसाठी तक्रार निवारण खासगी बस वाहतूकदारांनी प्रवाशांना दिसेल अशा ठिकाणी भाडेतक्ता स्पष्टपणे प्रसिद्ध करणे बंधनकारक आहे. प्रवाशांनीही तिकीट खरेदी करताना दर तपासून घ्यावेत. जर कोणताही बस चालक किंवा ट्रॅव्हल्स कंपनी जास्त भाडे वसूल करत असेल, तर प्रवाशांनी dyrto.37-mh@gov.in या अधिकृत ई-मेल आयडीवर तात्काळ तक्रार नोंदवावी.

प्रवाशांची सुरक्षितता आणि आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी सर्व नागरिक आणि बस वाहतूकदारांनी परिवहन विभागाच्या या मोहिमेस सहकार्य करावे, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, वाशिम यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## अवैध रेती वाहतुक करणारा टिप्पर पलटी !

**चालक गंभीर जखमी**

• सिटी न्युज ब्युरो @ रिसोड •

रिसोड तालुक्यात ओव्हरलोड रेती अवैध भरून अत्यंत वेगाने जाणाऱ्या एका टिप्परचे चालकावरील नियंत्रण सुटल्यामुळे हा टिप्पर राज्य महामार्गावर उलटला. टिप्परमध्ये क्षमतेपेक्षा जास्त (ओव्हरलोड) वाळू भरलेली होती.





टिप्पर पलटी झाल्यानंतर त्यामधील सर्व अवैध रेती राज्य महामार्गावर पसरली. या अपघातात टिप्परचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, चालक गंभीर जखमी झाला आहे. सुदैवाने, अपघात झाला त्या वेळी राज्यमार्गावर इतर कोणतेही वाहन किंवा पादचारी नसल्याने मोठी जीवितहानी टळली.वाशिमच्या दिशेने जाणारा एक अवैध रेती वाहतूक करणारा भरधाव टिप्पर राज्य महामार्गावरील सवड जवळ वीटभट्टी जवळ पलटी झाल्याची घटना १२ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजताच्या दरम्यान घडली.अवैध रेती वाहतूक करणारे टिप्पर गेल्या काही दिवसांपासून रात्री वेळी शहरातून भरधाव वेगाने धावत असल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहेत.मात्र या कडे महसुल प्रशासनाकडून अर्थपुर्ण दुर्लक्ष केले जात आहे.

या अपघातात टिप्पर चालक व सोबत असलेल्या एकाला गंभीर दुखापत झालायाने त्यांना तात्काळ नागरिकांनी ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.या राज्य महामार्गावर टिप्पर पलटी झाल्याने राज्य महामार्गावर रेती मोठ्याप्रमाणात पसरली आहे .रिसोड तालुक्यात अवैध रेती वाहतूक करणा-या तस्करावर महसूल व पोलीस प्रशासनाकडून काय कार्यवाई होते या कडे नागरिकांचे लक्ष लागले आहेत. मागील काही महिन्या अगोदर रॉयल्टी लिलाव मुद्दत बंद झाली असून दर दिवसाला हजारो ब्रास अवैध रेती उपसा कुठून होत आहे.यावर महसूल विभाग लक्ष का? देत नाही शहरात तर महसूल विभागातील कर्मचारी व रेती दलाल राम भरोसे यांच्या संगमंगतीने अर्थपूर्ण लक्ष देऊन दर दिवसाला हजारो ब्रास अवैध रेती शहरातून वाहतूक केली जात आहे.

## सुकलेल्या पिकांची स्मशानात होळी !

**नुकसान भरपाईसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना प्रचंड आक्रमक**



• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

वाशिम तालुक्यातील घोटा गावात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते आणि शेतकऱ्यांनी पावसा अभावी सुकलेलं सोयाबीनचं पीक स्मशानभूमीत जमा करून त्याची होळी केली आहे.या परिसरात गेल्या ४० दिवसांपासून पाऊस नसल्यानं खरिपाची पिकं पूर्णतः सुकून गेली आहेत त्यामुळे सरकारनं पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ भरीव जाहीर करावी अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे. मदत लवकर जाहीरना केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही स्वाभिमानी शेतकरी संघटने कडून सरकारला देण्यात आलाय.

## सण-उत्सव शांततेत व सलोख्याने साजरे करा ठाणेदार - राजेश खेरडे

• सिटी न्युज ब्युरो @ मेडशी •

मेडशी पोलीस चौकी येथे दि ११ सप्टेंबर रोजी आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर ठाणेदार राजेश खेरडे यांच्या अध्यक्षतेखाली शांतता समितीची बैठक उत्साहपूर्ण व शांत वातावरणात संपन्न झाली. यावेळी गावातील शांतता, सामाजिक सलोखा आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्याबाबत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

मेडशी पोलीस चौकी येथे दि ११ सप्टेंबर रोजी आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर ठाणेदार राजेश खेरडे यांच्या अध्यक्षतेखाली शांतता समितीची बैठक उत्साहपूर्ण व शांत वातावरणात संपन्न झाली. यावेळी गावातील शांतता,सामाजिक सलोखा आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्याबाबत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. बैठकीत सण-



उत्सव काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी नागरिकांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. बैठकीस शांतता समितीचे सदस्य, ग्रामस्थ व विविध समाजातील प्रतिष्ठित तनागरिक उपस्थित होते. उपस्थितांनी गावातील शांतता व सामाजिक एकोपा कायम ठेवण्यासाठी पोलिस प्रशासनास सहकार्य करण्याची ग्वाही दिली. या वेळी पोलिस उपनिरीक्षक त्र्यंबक गायकवाड, जमादार निलेश अहिर पोलीस कर्मचारी ज्ञानेश्वर सानप, विष्णु मुसळे, पोलिस पाटील अनीता चोथमल यांची सुद्धा उपस्थीती होती.

## मंगरुळपीर न्यायालयात लोक अदालतीत अनोखा सोहळा

**पती-पत्नीचा १० वर्षाचा संसार आणि दोन बालकांचे वाचले भविष्य**

• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •





सध्याच्या तांत्रिक युगात आणि बदलत्या जीवनशैलीमुळे पती-पत्नीमधील वाद, तुटणारी नाती आणि विस्कळीत होत चाललेली कुटुंबव्यवस्था ही एक गंभीर सामाजिक समस्या बनली आहे. विभक्त कुटूंब पध्दतीचा वाढता प्रभाव, ताणतणाव आणि संवादाचा अभाव यामुळे कौटुंबिक न्यायालयात घटस्फोट व वाद-विवादाच्या प्रकरणांचा अक्षरशः डोंगर साचला आहे. या कायदेशीर लढाईमुळे केवळ कौटूंबिक सौहार्दच नष्ट होत नाही, तर त्याचा ताण न्यायव्यवस्था आणि न्यायालयांच्या कामकाजावरही मोठ्या प्रमाणावर पडत आहे. अशा बिकट आणि ताण-तणावाच्या परिस्थितीत वर्षानुवर्ष चालणाऱ्या खटल्यांच्या कटकटीतुन सुटका करुन घेण्यासाठी आणि तुटणारी नाती जोडण्यासाठी 'लोकअदालत' ही एक वरदान ठरत आहेत. मंगरुळपीर येथे पार पडलेल्या राष्ट्रीय लोकअदलातीदरम्यान मुंबई उच्च न्यायालयाचे मा. न्यायमुर्ती श्री. देशपांडे साहेब यांनी वाशिम जिल्ह्यातील न्यायालयांना भेट देऊन न्यायालय स्वच्छता अभियानाची पाहणी केली. तसेच ही राष्ट्रीय लोकअदालत यशस्वी करण्यासाठी मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. अनिल सुब्रमण्यम, मंगरुळपीर जिल्हा न्यायाधीश श्रीमती प्रज्ञा काळे, दिवाणी न्यायाधीश व.स्तर नायगांवकर, सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर बेदरकर, सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर श्री. कलाल, मंगरुळपीर तालुका बार असोसिएशनचे अध्यक्ष , सचिव बेलोकर, समस्त विधिज्ञ मंडळ आणि न्यायालयीन कर्मचारीवृंदाने अथक परिश्रम घेतले. सदर लोक अदालतीमध्ये प्रिलिटीगेशनची ०३ प्रकरणे व न्यायालयातील ७७ प्रकरणे आपसी तडजोडीने निकाली काढण्यात आली. तसेच रक्कम रु. ६१,९६,००८/- तडजोड करण्यात आली.

## जे गणेशोत्सव मंडळ देणार कायदा सुव्यवस्थेला आकार, त्यांना देणार पुरस्कार, त्यांचा करणार सत्कार !



### सार्वजनिक गणेशोत्सव २०२६ पुरस्कार पर्यवेक्षण समितीची बैठक

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

उद्यापासून गणेशोत्सवाला प्रारंभ होत आहे, जे गणेशोत्सव मंडळ सामाजिक सलोखा राखून पारंपारीक पध्दतीने गणेशोत्सव साजरा करतील. त्यांना जिल्हा पोलिस दलाच्यावतीने उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळ पुरस्कार देवून सत्कार करण्यात येणार आहे. त्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव पुरस्कार पर्यवेक्षण समितीची स्थापना झाली असून या समितीची शहर पोलिस स्टेशन वाशीम येथे बैठक संपन्न झाली. यासाठी जिल्हा पोलिस अधीक्षक निकेश खाटमोडे पाटील यांनी पुढाकार घेतला आहे.

या बैठकीला उपविभागीय पोलिस अधिकारी रामकृष्ण पवार, शहर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक संजय चौधरी, साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त पद्मश्री ना.च.कांबळे, ज्येष्ठ पत्रकार माधवराव अंभोरे, व्यापारी संघाचे सचिव रुपेश लड्ढा, समाजसेवक वसंतराव धाडवे, प्रा.गजानन वाघ, मुख्याध्यापक जर्नादन बोरकर, माळी युवा मंचाचे नागेश काळे, पत्रकार किशोर गामाशे, अतिष देशमुख , मानोज जयस्वाल हे उपस्थित होते. यावेळी वाशीम शहरात जे गणेशोत्सव मंडळ उत्कृष्ट कार्य करून कायदा सुव्यवस्थेचे पालन करतील त्यांना पुरस्कार देण्याचे ठरविले आहे. त्यासाठी काही नियम व निकस समिती तयार करणार आहे.

जे गणेशोत्सव मंडळ गणेश मुर्तीची आकार्षक सजावट करून कलात्मक पारंपारीकतेला प्राधान्य देवून सामाजिक संदेश देतील, स्वच्छता सुलभता व सुरक्षीतता राखवून परिसराची स्वच्छता ठेवतील, सामाजिक उपक्रमातून रक्तदान आरोग्य शिबिरातून गरजूंना मदत करतील, सामाजिक जनजागृतीतून शिक्षण, व्यवसनमुक्ती, महिला व बाल सुरक्षेला प्राधान्य देतील पर्यावरण पुरक प्लास्टीक मुक्ती निर्मल्य व्यवस्थापन ध्वनी प्रदुषण नियंत्रण करतील. शिस्त व व्यवस्थापन स्वयंम सेवकांचे नियोजन गर्दी नियंत्रण वेळेचे व्यवस्थापन करतील, सुरक्षा व्यवस्था, अग्नि सुरक्षा, विद्युत व्यवस्था आपतकालीन उपाय योजना करतील,सांस्कृतिक धार्मिक कार्यक्रमातून आरती,भजन, किर्तन उपक्रम राबवितील नाविण्य पुर्ण संकल्पनेतून आगळा वेगळा उपक्रम राबवून समाजावर सकारात्मक प्रभाव पाडतील व सर्वात महत्वाचे कायदा सुव्यवस्थेचे पालन करून समाजातील नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची काळजी घेतील अशा गणेशोत्सव मंडळाला पुरस्कार देवून सत्कार करण्यात येणार आहे. तरी सर्वगणेशोत्सव मंडळांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे असे आवाहन पोलिस दलांच्या वतीने करण्यात आले आहे.

## मंगरुळपीर येथे शांतता समितीची बैठक

**गणेश उत्सवांच्या पार्श्वभूमीवर शांतता व सलोखा राखण्याचे आवाहन**

• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •



शहरातील आगामी गणेश उत्सवांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी तहसील कार्यालयाच्या तहसील हॉलमध्ये शांतता समितीची बैठक उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

या बैठकीला पोलीस उपविभागीय अधिकारी विशाल शिरसागर,पोलीस उपअधीक्षक लता फंड मॅडम पोलीस निरीक्षक शेळके साहेब, निवासी तहसीलदार रवी राठोड, तसेच उपविभागीय अधिकारी रवि काळे साहेब यांच्या सह शांतता समितीचे सदस्य, विविध विभागांचे अधिकारी व नागरिक उपस्थित होते.बैठकीदरम्यान शहरातील कायदा व सुव्यवस्था, गणेश उत्सवांच्या काळातील शांतता, सामाजिक सलोखा आणि नागरिकांनी प्रशासनाला करावयाच्या सहकार्याबाबत चर्चा करण्यात आली. कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता सामाजिक शांतता अबाधित ठेवण्यासाठी सर्वांनी जबाबदारीने वागावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.गणेश उत्सवांच्या काळात नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत पोलीस प्रशासनाकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

तसेच विविध समाजघटकांनी परस्पर सहकार्य व बंधुभाव कायम ठेवून उत्सव शांततेत साजरे करण्याचे आवाहन करण्यात आले. बैठकीत उपस्थित शांतता समितीच्या सदस्यांनी ही प्रशासनाला सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper.citynewssuperfast.com


## खेळाडूंची जिल्हा सॉफ्टबॉल स्पर्धेत दमदार कामगिरी!

**मलकापूर:** तालुका क्रीडा संकुल येथे झालेल्या जिल्हास्तरीय शालेय सॉफ्टबॉल स्पर्धेत स्कूल ऑफ स्कॉलर्सच्या खेळाडूंनी पाचही गटांत विजेतेपद पटकावून उल्लेखनीय कामगिरी केली. या यशामुळे पाचही विजयी संघांची अमरावती विभागीय शालेय सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी निवड झाली. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद, बुलढाणा तसेच बुलढाणा सॉफ्टबॉल संघटनेच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. जिल्ह्यातील विविध शाळांच्या संघांनी यात सहभाग घेतला. स्कूल ऑफ स्कॉलर्सने १४ वर्षांखालील मुला-मुलींचे, १७ वर्षांखालील मुला- मुलींचे आणि १९ वर्षांखालील मुलांचे अशा पाचही गटांत बाजी मारली. १४ वर्षांखालील मुलांच्या अंतिम सामन्यात स्कूल ऑफ स्कॉलर्सने नूतन इंग्लिश स्कूलचा सहा धावांनी पराभव करत विजेतेपद मिळविले.

# चाळीसबिघा अभ्यासिका पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांचे जोरदार धरणे आंदोलन

### पावसाची तमा न बाळगता विद्यार्थ्यांचा एल्गार; सर्वपक्षीय नेत्यांसह नागरिकांचा उत्स्फूर्त पाठिंबा

प्रतिनिधी १३ सप्टेंबर



**मलकापूर :** चाळीसबिघा परिसरातील विद्यार्थ्यांसाठी मंजूर करण्यात आलेली मात्र अद्याप अपूर्ण असलेली अभ्यासिका तातडीने पूर्ण करून विद्यार्थ्यांच्या वापरासाठी उपलब्ध करून द्यावी, या प्रमुख मागणीसाठी लीगल फायटर्स फाउंडेशन, मलकापूर व समस्त विद्यार्थ्यांच्या वतीने तहसील कार्यालय, मलकापूर समोर एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.

आंदोलनाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धरणे आंदोलन केले. आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांनी आपापली मते मांडत अभ्यासिकेची सद्यस्थिती, अभ्यास करताना येणाऱ्या अडचणी आणि विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांचा अनुभव कथन केला.

यावेळी विद्यार्थ्यांनी "अभ्यासिका आमच्या हक्काची, नाही कुणाच्या बापाची!", "आमचा हक्क मिळवल्याशिवाय आम्ही गप्प बसणार नाही!", "अभ्यासिका पूर्ण झालीच पाहिजे!", "आश्वासन नको, प्रत्यक्ष कृती हवी!" अशा जोरदार घोषणा देत प्रशासनाचे लक्ष वेधले.

दरम्यान, नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांनी दूरध्वनीद्वारे आंदोलकांशी संपर्क साधून येत्या मंगळवारी आंदोलकांच्या शिष्टमंडळासोबत मुख्याधिकारी, संबंधित ठेकेदार व मतदारसंघाचे आमदार यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित करून अभ्यासिकेच्या कामाबाबत चर्चा करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

या आंदोलनाला तहसीलदार सोनवणे, ॲड. एस. एस. मोरे, शिक्षण सभापती भाई अशांत वानखेडे, शिवराज जाधव, प्रसाद जाधव, किशोरभाऊ नवले, राजूभाऊ सावळे, ॲड. जी. डी. पाटील, ॲड. देवकुमार वानखेडे, दुर्गेश राजापुरे, अरुण अग्रवाल, निलेश नारखेडे, ओम शिंदे यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांच्या मागणीचे समर्थन केले.

**"अभ्यासिका विद्यार्थ्यांच्या वापरात आली नाही तर आंदोलन तीव्र करू"**

आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांनी आपल्या वैयक्तिक अनुभवातून अभ्यासासाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी मांडल्या. अभ्यासिकेबाबत त्वरित ठोस कार्यवाही करून ती विद्यार्थ्यांच्या वापरात आणण्यात आली नाही, तर यापेक्षा मोठे आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून दिला.

#### सर्वपक्षीय नेत्यांचा आंदोलनाला पाठिंबा

» मलकापूर शहरासह पंचक्रोशीतील विविध पक्षांच्या पुढाऱ्यांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन विद्यार्थ्यांच्या मागणीला समर्थन दिले. यावेळी काही मान्यवरांनी संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना दूरध्वनीवरून संपर्क साधून अभ्यासिकेचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या.

#### आंदोलन यशस्वी करण्यासाठी अनेकांचे योगदान

» आंदोलन यशस्वी करण्यासाठी ॲड. सचिन देशमुख, ॲड. दिपाली टाक, प्राध्यापक नरेंद्र सुरळकर, प्रा. विशाल पाटील, मेजर माणिक खराटे, पवन बोराडे, गौरव घन, शुभम डोसे, ऋषिकेश काळे, रोहन व्यवहारे, मयूर भोलनकर, तेजस गायकवाड, सूपेश तायडे, सुरज झाल्टे, सागर वराळे व अभय थाटे यांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य केले.

विशेष म्हणजे, आंदोलनात विद्यार्थिनींचाही मोठ्या संख्येने सहभाग दिसून आला. विद्यार्थ्यांच्या मागणीला पाठिंबा देण्यासाठी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने आंदोलनस्थळी दाखल झाले. स्टेजच्या परिसरात नागरिकांची गर्दी झाली होती.

आंदोलनाच्या वेळी पावसाचे सावट होते आणि पावसाला सुरुवात झाल्यानंतरही विद्यार्थ्यांनी आंदोलनातून माघार घेतली नाही. पावसाची तमा न बाळगता विद्यार्थ्यांनी आंदोलनात सहभाग कायम ठेवत आपल्या शैक्षणिक हक्कासाठीचा निर्धार व्यक्त केला.

अपूर्ण अभ्यासिका पूर्ण होऊन ती विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष वापरात येईपर्यंत हा प्रश्न सोडणार नाही, अशी भूमिका विद्यार्थ्यांनी यावेळी स्पष्ट केली.

**"विद्यार्थ्यांचा एकच नारा — अभ्यासिका पूर्ण करा!"**

"आश्वासन नको, प्रत्यक्ष कृती हवी!"

"शिक्षणाच्या हक्कासाठी संघर्ष सुरूच राहील!"

आयोजक : लीगल फायटर्स फाउंडेशन, मलकापूर व समस्त विद्यार्थी

# कायदा व सुव्यवस्थेचे पालन करून गणेशोत्सव साजरा करा

### आ. संचेती उपस्थीतीत शांतता समितीची सभा संपन्न

प्रतिनिधी १३ सप्टेंबर



**नांदुरा :** जातीय सलोखा कायम ठेवत कायदा व सुव्यवस्थेचे पालन करून पारंपरिक पद्धतीने श्री गणेश उत्सव अतिशय उत्साहात साजरा करा असे आवाहन आ. चैनसुख संचेती यांनी नांदुरा पोलीस स्टेशनच्या वतीने आयोजित शांतता समितीच्या सभेत केले.

१२ सप्टेंबर रोजी नांदुरा पोलिसांच्या वतीने गणेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेच्या छ.शिवाजी महाराज सभागृह टाऊन हॉलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या शांतता समितीच्या सभेत उपस्थित गणेश मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना अध्यक्षीय मार्गदर्शन करताना आमदार संचेती बोलत होते.

याप्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक पियुष जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी सोहन माछेरे, तहसीलदार श्रीशैल व्हट्टे, ठाणेदार जयवंत सातव व भाजपा नेते सुधीर मुर्हेकर या मान्यवरांची व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून याप्रसंगी उपस्थिती होती.

आ. संचेती यावेळी बोलताना पुढे म्हणाले की उत्सव साजरा करताना इतरांना त्याचा त्रास होणार नाही याची काळजी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी घ्यावी. तसेच सर्वांसाठीच घातक असणाऱ्या कर्ण कर्कश डीजेंचा आणि लेझर लाईट चा वापर न करता पारंपारिक वाद्यांचा वापर करावा त्यामुळे ध्वनी प्रदूषणासह ज्येष्ठ नागरिक लहान मुले आणि रुग्णांना होणारा त्रास कमी होईल असे त्यांनी नमूद केले. जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी गणेश मंडळांनी पोलीस प्रशासनाच्या सूचनांचे काटे कोर पालन करावे असे स्पष्ट करताना तरुणांनी समाज माध्यमांचा वापर जबाबदारीने करावा. तसेच समाज माध्यमांवर कोणतेही आक्षेपार्ह व्हिडिओ प्रसारित करू नयेत. शांतता समितीच्या सदस्यांनी यासाठी पुढाकार घेत जनजागृती करावी. तसेच गणेश मंडळांनी धार्मिक कार्यक्रमां सोबत व्यसनमुक्तींसह समाज उपयोगी उपक्रम राबवून तरुणांना व्यसनांपासून परावृत्त करावे असे सांगितले. तर अप्पर पोलीस अधीक्षक पियुष जगताप यांनी गणेश मंडळांनी उत्सव साजरा करताना पारंपारिक वाद्यांचा वापर करून स्वतःची आणि इतरांचीही काळजी घ्यावी अशी अपेक्षा व्यक्त केली. ठाणेदार जयवंत सातव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना गणेश मंडळांनी आपल्या व इतरांच्या सुरक्षेसाठी जमा झालेल्या देणगी मधून सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच गणेश उत्सवासह आगामी येणारे सर्व उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला आमदार चैनसुख संचेती, जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्यासह उपस्थित मान्यवरांचे नांदुरा पोलिसांच्या वतीने ठाणेदार जयवंत सातव यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

कार्यक्रमाचे संचालन नांदुरा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष महेश पांडे यांनी तर आभार प्रदर्शन सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमराज कोळी यांनी केले. शांतता समितीच्या सभेला गणेश मंडळाचे पदाधिकारी, पोलीस पाटील, वीज वितरण कंपनीचे अधिकारी, न. प. चे अधिकारी तसेच सर्व समाजातील नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती

## पत्नीवर चाकूहल्ला करून फरार आरोपी पोलिसांच्या ताब्यात

प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**खामगाव:** पत्नीवर चाकूने १० ते १२ वार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर फरार असलेल्या आरोपीला १२ सप्टेंबर रोजी खामगाव शहर पोलिसांनी ताब्यात घेतले. विजय विठ्ठल दुधाटकर (४२, रा. खामगाव) असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे.

वाशिम जिल्ह्यातील मालेगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली होती. याप्रकरणी मालेगाव पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९(१) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी विजय दुधाटकर फरार झाला होता. दरम्यान, फरार आरोपी खामगाव शहरात असल्याची माहिती खामगाव शहर पोलिसांना मिळाली. माहितीच्याआधारे पोलिसांनी शोधमोहीम राबवत आरोपीला ताब्यात घेतले. त्यानंतर पुढील कायदेशीर कारवाईसाठी त्याला मालेगाव पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. ही कारवाई शहर पोलिस निरीक्षक सुरेंद्र अहीरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कॉन्स्टेबल राम धामोळे, अमर ठाकूर आणि दीपक डीघोळे यांनी केली. पुढील तपास मालेगाव पोलिसांकडून सुरू आहे.

## पंत नगर परिसरात चोरट्याने केला दागिन्यांसह 60 हजारांचा ऐवज लंपास

प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**मलकापूर :** शहरातील पंतनगर परिसरात अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून रोख रक्कम व सोन्याची अंगठी असा एकूण सुमारे ६० हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना ११ सप्टेंबर रोजी दुपारी घडली.

याबाबत डॉ. राहुल राजधर मेढे (रा. पंतनगर, मलकापूर) यांनी मलकापूर शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यांच्या तक्रारीनुसार, ११ सप्टेंबर रोजी दुपारी २.३० ते ३ वाजेच्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने घराचा दरवाजा लोटून आत प्रवेश केला. घरातील अलमारीत ठेवलेल्या पर्समधून २८ हजार रुपये रोख तसेच अंदाजे ३२ हजार रुपये किमतीची ५ ग्रॅम वजनाची सोन्याची जुनी अंगठी असा एकूण ६० हजार रुपयांचा ऐवज चोरीस गेला असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी मलकापूर शहर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध कलम 331(3), 305 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास एएसआय संजय निंबोळकर करीत आहेत.

सध्या परिस्थितीत मलकापूर तालुक्यात चोरीच्या घटना फार मोठ्या प्रमाणावर होत आहे त्या पार्श्वभूमीवर अनेक परिसरामध्ये नागरिकांकडून रात्रीची गस्त घालण्यात येत आहे अनेक नागरिक थोडक्याने परिसरात पहारा देत आहेत. असे असताना सुद्धा शहरात चोरीची घटना घडली त्यामुळे एक प्रकारे चिंतेचे वातावरण तयार झाले आहे.

## शेतीच्या वादातून दोन गटांत हाणामारी; गुन्हे दाखल

### घारोड शिवारातील घटना; दोन्ही गटांच्या तक्रारी

प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**खामगाव :** तालुक्यातील लाखनवाडा येथील दोन गटांमध्ये शेतीच्या वादातून हाणामारी झाल्याची घटना ११ सप्टेंबर रोजी घारोड शेतशिवारात घडली. या प्रकरणी दोन्ही गटांनी एकमेकांविरुद्ध तक्रारी दिल्याने हिवरखेड पोलिसांनी परस्परविरोधी गुन्हे दाखल केले आहेत.

दिलीप महादेव मासाळ यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ११ सप्टेंबर रोजी दुपारी चारच्या सुमारास शेतीच्या अतिक्रमणाच्या कारणावरून त्यांचा नातेवाइकांशी वाद झाला. यावेळी त्यांना अश्लील शिवीगाळ करण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे. तसेच एका व्यक्तीने त्यांच्या काकाला मारहाण करून धक्का दिला. त्यामुळे ते खाली पडून त्यांच्या हाताला दुखापत झाली. त्यानंतर अन्य दोन जणांनी दिलीप मासाळ यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यात त्यांच्या डोक्याला दुखापत होऊन रक्तस्राव झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. या तक्रारीवरून हिवरखेड पोलिसांनी दुधीराम नातू मांकड, अंकुश नातू मांकड आणि भानुदास भोजाजी मरकड यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

दरम्यान, अंकुश नटू मार्कड यांनीही पोलिसांत स्वतंत्र तक्रार दिली. त्यांच्या तक्रारीनुसार, ११ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास काही जण जेसीबी घेऊन घारोड शिवारात आले. मेंढ्यांचा वाडा खाली करून जागा मोकळी करण्यास सांगितल्याने वाद झाला. यावेळी फिर्यादीचा भाऊ व आई तेथे आले. त्यानंतर झालेल्या वादात आरोपींनी काठीने हातावर आणि डोक्यावर मारहाण केल्याने अंकुश मार्कड जखमी होऊन बेशुद्ध पडल्याचे तक्रारीत म्हटले आहे. त्यांना उपचारासाठी खामगाव येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या तक्रारीवरून नंदू चंदू मासाळ, सुनील मखन मासाळ, स्वप्नील दादाराव मासाळ, कौतिक महादेव मासाळ आणि मखन पावसू मासाळ यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनतर्फे आज रक्तदान शिबिर

**चिखली :** महाराज यांच्या कृपाशीर्वादाने संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन, शाखा चिखली (जि. बुलढाणा) च्या वतीने १३ सप्टेंबर रोजी सकाळी ८:३० ते दुपारी ४:०० वाजेपर्यंत संत निरंकारी सत्संग भवन, चिखली (शेलुद) येथे रक्तदार शिबिर आयोजित केले आहे. सतगुरू माता सुदीक्षाजी या शिबिरात उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन रक्तदान करावे आणि इतरांनाही यासाठी प्रेरित करावे, असे आवाहन संत निरंकारी मंडळ, शाखा चिखली यांच्या वतीने करण्यात आले आहे. १८ ते ५५ वयोगटातील आणि ४५ किलोग्रॅमपेक्षा जास्त वजन असलेल्या व्यक्ती रक्तदान करू शकतात, हिमोग्लोबिनचे प्रमाण १२.५ ग्रॅमपेक्षा जास्त असणे आवश्यक आहे.

## निमगाव फाट्यावर देशी कट्टा, मॅगझीनसह 85 हजारांचा मुद्देमाल जप्त

### नांदुरा पोलिसांची कारवाई; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**नांदुरा:** निमगाव फाटा येथील एका हॉटेल परिसरात शुक्रवारी पोलिसांनी छापा टाकून विनापरवाना देशी बनावटीचा कट्टा, मॅगझीन, मोटारसायकल व मोबाइल, असा एकूण ८५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

या कारवाईत रविंद्र विठ्ठल वेरुळकर (२९) व पवन कौतुकराव वेरुळकर (३०), दोघेही (रा. येरळी, ता. नांदुरा, जि. बुलढाणा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल सायंकाळी ५:१६ वाजता पोलिसांना मिळालेल्या माहितीच्या आधारे निमगाव फाटा येथील हॉटेल माऊली बार रेस्टॉरंटमध्ये कारवाई करण्यात आली. यावेळी रविंद्र विठ्ठल वेरुळकर याच्या ताब्यातून अंदाजे ४० हजार रुपये किमतीचा चांदीच्या रंगाचा देशी बनावटीचा कट्टा आणि ५ हजार रुपये किमतीचे मॅगझीन जप्त करण्यात आले, तसेच त्याच्याकडून अंदाजे ३० हजार रुपये किमतीची मोटारसायकल (क्रमांक एम. एच. २८ सीए ७६२७) आणि १० हजार रुपये किमतीचा मोबाइल जप्त करण्यात आला. या प्रकरणी रविंद्र विठ्ठल वेरुळकर व पवन कौतुकराव वेरुळकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक थुल करीत आहे

## मालवाहू वाहन-दुचाकीच्या धडकेत दोन तरुणांचा मृत्यू

### काळेगाव फाट्याजवळील घटना: एकजण जखमी

प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**खामगाव :** खामगावहून बुलढाण्याकडे परतणाऱ्या दोन मित्रांच्या दुचाकीला समोरून येणाऱ्या मालवाहू वाहनाने धडक दिल्याने दोघांचाही मृत्यू झाला. बुलढाणा-खामगाव मार्गावरील काळेगाव फाट्याजवळ शुक्रवारी रात्री आठच्या सुमारास हा अपघात घडला. सैय्यद आदिल सैय्यद जहीर (वय २०) आणि शेख अरमान शेख इम्रान (वय २१, दोघेही रा. जोहरनगर, बुलढाणा) अशी मृतांची नावे आहेत.

प्राप्त माहितीनुसार, आदिल आणि अरमान हे दोघे मित्र शुक्रवारी एका नातेवाइकाला भेटण्यासाठी खामगावला गेले होते. रात्री एम. एच. २८ एयू ४२२ क्रमांकाच्या दुचाकीने बुलढाण्याकडे परतत असताना काळेगाव फाट्याजवळ त्यांच्या दुचाकीची चुकीच्या दिशेने येणाऱ्या एम. एच. २७ डीटी ००९० क्रमांकाच्या मालवाहू वाहनाशी जोरदार धडक झाली. धडकेची तीव्रता एवढी होती की दुचाकीचा चुराडा झाला आणि दोघेही गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. दोन्ही जखमींना तातडीने खामगाव येथील सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती चिंताजनक असल्याने डॉक्टरांनी त्यांना पुढील उपचारांसाठी अकोला येथे मात्र, पाठविले. उपचारादरम्यान दोघांचाही मृत्यू झाला. शनिवारी सायंकाळी बुलढाणा येथील कब्रस्तानात दोघांवर अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान, मालवाहू वाहनातून प्रवास करणारा वरूड येथील नीरज गचकेश्वर हा युवक किरकोळ जखमी झाला.

## आयुष उपचार शिबिरात तपासणी

प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**खामगाव:** ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना विविध पद्धतींच्या आयुष आरोग्यसेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने गुरुवारी लाखनवाडा येथील ग्रामीण रुग्णालयात मोफत आयुष रोगनिदान व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात तब्बल ५४८ नागरिकांची आरोग्य तपासणी करून त्यांना आवश्यक आयुष उपचार व औषधोपचाराचा लाभ देण्यात आला. आयुष मंत्रालय, भारत सरकार यांच्या संकल्पनेतून राष्ट्रीय आयुष अभियान, आरोग्य विभाग, जिल्हा रुग्णालय व जिल्हा परिषद, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर घेण्यात आले. यावेळी आयुर्वेद, युनानी, होमिओपॅथी तसेच योग व निसर्गोपचाराच्या माध्यमातून नागरिकांची तपासणी, रोगनिदान आणि उपचार करण्यात आले. आयुर्वेद तज्ज्ञ डॉ. सचिन चव्हाण, डॉ. गणेश हरणे, युनानी तज्ज्ञ डॉ. मोईन खान आणि होमिओपॅथी तज्ज्ञ डॉ. स्वाती धारस्कर यांनी रुग्णांची तपासणी करून आवश्यक उपचार केले. जिल्हा आयुष अधिकारी डॉ. प्रशांत तांगडे यांच्या अध्यक्षतेखाली शिबिराचे आयोजन करण्यात आले. जिल्हा आयुष सल्लागार डॉ. मोहम्मद शफाअत, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक (आयुष) डॉ. जुनेद इब्राहिम, सौरभ कुळकर्णी व रामेश्वर भोलाने यांची उपस्थिती होती. डॉ. प्रशांत तांगडे यांनी महत्त्व सांगितले.

## पालक न्यायमूर्तींकडून जळगाव न्यायालयाची पाहणी

### न्यायालय सुरू करण्याच्या पार्श्वभूमीवर सुविधांची पाहणी

प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**जळगाव जामोद:** जळगाव जामोद येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय सुरू करण्याच्या पार्श्वभूमीवर उच्च न्यायालयाचे पालक न्यायमूर्ती एन. एम. नेरलीकर व जिल्हा व सत्र न्यायाधीश जगमलानी यांनी शनिवार, १२ सप्टेंबर रोजी जळगाव न्यायालयास भेट देऊन इमारत तसेच उपलब्ध सोयी-सुविधांची पाहणी केली.

यावेळी जळगाव जामोद वकील संघाचे अध्यक्ष ॲड. रुपेश विश्वेकर, उपाध्यक्ष शिव खुपसे, सचिव ॲड. अभिमन्यू वाघ यांच्यासह वकील संघाचे वरिष्ठ व कनिष्ठ सदस्य उपस्थित होते. जळगाव जामोद येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय शक्य तितक्या लवकर सुरू करण्यात यावे, या मागणीचा प्रस्ताव वकील संघाच्या वतीने पालक न्यायमूर्ती एन. एम. नेरलीकर यांना देण्यात आला.

यावेळी कार्यकारी अभियंता तळले, कनिष्ठ अभियंता फुलसिंग, कंत्राटदार अक्षय देशमुख, उपअभियंता वाडीभस्मे, विद्युत विभागाचे कनिष्ठ अभियंता मापारी, प्रशांत क्षीरसागर, तहसीलदार पवन पाटील, ठाणेदार सचिन बागुल व जिल्हा सरकारी वकील भटकर उपस्थित होते. सूत्रसंचालन ॲड. करीम खान यांनी केले. यशस्वितेसाठी ॲड. दत्ता खेडेकर, ॲड. उमरकर, ॲड. मानकर, ॲड. मुकुंदा, ॲड. प्रियांका करांगळे, ॲड. कल्पना डोंगरदिवे, ॲड. वानखेडे, सहसचिव ॲड. विद्या ताथोड, ॲड. राहुल इंगळे तसेच वकील संघाच्या सदस्यांनी सहकार्य केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com



# राज्यातील शासकीय व खाजगी रुग्णालयांना शासनाचे कडक निर्देश

## तीन महिन्याच्या आत अग्नी व विद्युत सुरक्षा प्रमाणपत्र आवश्यक

प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**अकोला :** अमरावती येथील जिला महिला रुग्णालय अर्थात डफरिन रुग्णालयातील आगीच्या दुर्घटनेची गंभीर दखल घेत राज्य शासनाने राज्यातील सर्व शासकीय आणि खासगी रुग्णालयांच्या विद्युत व अग्निसुरक्षेबाबत कडक निर्देश जारी केले आहेत.

रुग्णालयांनी विद्युत सुरक्षा तपासणी करून प्रमाणपत्र तसेच सक्षम अग्निशमन प्राधिकरणाकडून अद्ययावत अग्निसुरक्षा प्रमाणपत्र प्राप्त करणे बंधनकारक करण्यात आले आहे. यासाठी रुग्णालयांना तीन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या उपसचिव राजश्री सारंग यांनी यासंदर्भात परिपत्रक जारी केले आहे. त्यानुसार शासकीय उपजिल्हा रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, महापालिका रुग्णालये




तसेच खासगी रुग्णालयांनाही हे निर्देश लागू राहणार आहेत. रुग्णालयातील मुख्य विद्युत पुरवठा, वायरिंग, विद्युत भारक्षमता, अर्थिंग, विद्युत परिपथ जनरेटर, यूपीएस आणि अन्य पर्यायी वीजपुरवठा यंत्रणेची सार्वजनिक केंद्रे, बांधकाम विभागाच्या विद्युत अधिकाऱ्यांकडून तांत्रिक तपासणी करण्यात येणार आहे. तपासणीनंतर संबंधित रुग्णालयाला विद्युत सुरक्षा लागू प्रमाणपत्र घ्यावे लागणार आहे. अतिदक्षता विभाग, नवजात शिशू अतिदक्षता विभाग, बाल अतिदक्षता विभाग, शस्त्रक्रिया कक्ष, डायलिसिस केंद्र, ऑक्सिजन यंत्रणा, प्रयोगशाळा आणि केबल व्यवस्थेकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### नियमांचे पालन करणाऱ्या रुग्णालयांवर होईल कारवाई

» तीन महिन्याच्या आत तपासणी पूर्ण करून आवश्यक प्रमाणपत्रे प्राप्त करणे सर्व रुग्णालयांना बंधनकारक आहे तपासणीत सुरक्षाविषयक कृती आढळल्यास त्या दूर करण्याची जबाबदारी संबंधित रुग्णालय प्रशासनाची राहणार आहे सुरक्षा नियमांचे पालन करणाऱ्या रुग्णालयांवर नियमानुसार कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे

# श्रींच्या पुण्यतिथी उत्सवाला सुरुवात

## भजनी दिंड्यांचे आगमन, श्री गणेशयाग व वरूण यागला सुरवात





प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**शेगांव :** श्री संत गजानन महाराज संस्थान शेगांव येथे श्रींच्या ११६ व्या पुण्यतिथी उत्सवाला मोठ्या उत्साहात सुरुवात झाली आज दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी मोठ्या उत्साहात सुरुवात झाली आहे या उत्सवानिमित्त पाच दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे यामध्ये दररोज सकाळी ६ ते ६.४५ काकडा, ७.१५ ते ९. भजन, दुपारी ४ ते ५ प्रवचन, सायंकाळी ५.३० ते ६ हरिपाठ व रात्री महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार यांचे रात्री ८ ते १० हरि कीर्तन होणार आहे. दि.१२ सप्टेबर रोजी ह.भ.प. प्रशांत बुवा ताकोते, रा. शिरसोली, दि.१३ सप्टेबर रोजी ह.भ.प. सुरेश बुवा बाकडे रा.पोफाळी, दि.१४ सप्टेबर रोजी ह.भ.प. भरत बुवा चौधरी, रा.म्हैसवाडी, दि.१५ सप्टेबर रोजी ह.भ.प.अच्युत बुवा दस्तापूरकर रा.परभणी. दिनांक १५ सप्टेबर २६ मंगळवार मिती भाद्रपद शु.४ ला श्री.ह.भ.प. भरत बुवा चौधरी, मु. म्हैसवाडी यांचे सकाळी ७ ते ९ "श्रींचे समाधि सोहळ्या निमित्य" कीर्तन होईल. या उत्सवात आज दि.१२ सप्टेंबर रोजी श्री गणेशयाग व वरून यागला सुरुवात झाली असून दि. १५ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता यागाची पूर्णाहुती, अवभृत स्नान होईल तसेच दुपारी उत्सवांची श्रींची पालखी अश्व, पताका धारी, टाळकरी, सह परिक्रमा निघेल व दिनांक १६ सप्टेबर वार बुधवार मिती भाद्रपद शु.५ ला श्री.ह.भ.प.निवृत्ती बुवा तराळे मु.व्याळा यांचे सकाळी ६ ते ७ काल्याचे कीर्तन व नंतर दहिहंडी, गोपाल काल्याने उत्सवाचे सांगता होणार आहे. श्रींच्या मंदिर परिसरात रंग बेरंगी आकर्षणाची विद्युत रोषणाई करण्यात आली आहे

श्री तसेच श्रींच्या पुण्यतिथी उत्सवात सहभागी होण्यासाठी राज्यातील भजनी दिंडया ज्ञानोबा तुकाराम, गजानन अवलिया अवतरले जंग तारांच्या नामघोष करीत संत नगरीत दाखल होत आहे. श्रींच्या मंदिरात व परिसरात आंब्याच्या पानाची तोरणे केळीचे खांब लावून सर्वत्र मंगलमय वातावरण निर्माण झाले आहे.

# जैन धर्मिय "पर्व पर्युषण" आनंदोत्सव थाटात शुरु





प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**अकोला :** भारतीय सणाच्या रेलचेल मध्ये जैन धर्मिथ पर्व पर्युषण हा सण श्रावण शेवट आणि भाद्रपद आरंभ असा आठ दिवसीय पर्व सण आहे. या आठ दिवसात पुर्ण जैन समाज अत्यंत भक्तीभावाने पुजन, आराधना, भक्ती संगीत, मिरवणूक, तपतपस्या आणि आंगी रचना(मुर्ती सजवणे) करतात. अकोला येथील श्री. आदेश्वर जैन मंदिर, श्री सभवनाथ जैन मंदिर, श्री वासुपुज्य जैन मंदिर आणि श्री दादावाडी जैन मंदिर येथे आकर्षण रोशनाई, देखावा आणि सजावट केली आहे. पुरुष महीला आणि लहान मुलांनी मंदिरे भरलेली आहेत. १०० वर्षे पुर्ण करुन तिर्थ झालेला गाधीं चौक येथील श्री. आदेश्वर जैन मंदिर येथे हा उत्सव परमपूज्य पण्यासजी श्री.. राजहंसविजयजी महाराज साहेब आदी ठाना ३ यांच्या पवित्र सानिध्यात सुरू आहे. दैनदिन सुकर,सुंदर आणि आकर्षण आंगी सकल जैन संध श्राविका यांचा अथक परिश्रम व सहभागातून साकारली जात आहे. आज भगवान महावीर स्वामी यांचा प्रतिकात्मक जन्म कल्याणक महोत्सव साजरा केला जातो. माता त्रिशलादेवी ने पाहिलेले अलौकिक १४ स्वप्न चे अवतरत केल्या जाते. संपूर्ण कार्यक्रमात जैन समाज उत्साही सहभागी होवून आनंदोत्सव साजरा करीत आहे. आजच्या कार्यक्रमा ची सांगता श्री. जैन सकल संध स्वामीवात्सल्य ( भोजनप्रसादी) करण्यात आली.

# बुलेट चालकांना वाहतूक पोलिसांचे फटाके

## 20 पेक्षा जास्त बुलेट धारकांवर दंडात्मक कारवाई





प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**अकोला:** शहरात कर्कश आणि मोठा फटाका आवाज असलेल्या बुलेट ताब्यात घेत त्यांचे सायलेंसर काढण्यात आले. वाहतूक पोलिसांनी ही कारवाई केली. एकाच दिवसात सुमारे 20 बुलेट वाहनांचे सायलेंसर जमा करून वाहतूक शाखेने दंडात्मक कारवाई केली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या संकल्पनेतून आणि शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे नव्यानेच रुजू झालेले पोलीस निरीक्षक विलास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष मोहीम राबविण्यात आली. शनिवारी दारू पिऊन वाहन चालविणाऱ्या, विना हेल्मेट तसेच ट्रिपल सीट वाहन चालवणाऱ्यां 185 जणांवर कारवाई करण्यात आली त्यानंतर आज रविवारी सकाळी कर्कश व मोठा आवाज करीत फटाके फोडणाऱ्या बुलेट चालकांवर कारवाई करण्यात आली. गणेशोत्सवा आधी शहरात वाहतूक शाखेने आता 'शांतता व सुव्यवस्था' राखण्यासाठी पुढाकार घेतला आहे. कर्कश आणि मोठा फटाका आवाज असलेल्या बुलेट ताब्यात घेत त्यांचे सायलेंसर जागेवरच काढून कारवाई करण्याची मोहीम हाती घेतली आहे. एकाच दिवशी सुमारे 20 गाड्यांचे सायलेंसर जमा करून वाहतूक शाखेने दंडात्मक कारवाई केली आहे.

बुलेट वापरण्याचे प्रमाण वाढले

सध्या शहरातील वेगवेगळ्या भागात आणि महाविद्यालय परिसरात तरुणांकडे बुलेट गाड्या वापरण्याचे प्रमाण अधिक आहे.

मात्र कंपनीने दिलेल्या या गाड्यांमध्ये मनाप्रमाणे हवा असा बदल करून या गाड्या बदल करण्याकडे तरुणांना रस आहे. त्यामुळे कंपनीचे सायलेंसर काढून त्या जागी फटाका सायलेंसर टाकून ही वाहने शहरातील प्रत्येक रस्त्यावर मोठा आवाज काढत फिरतात. याचा नाहक त्रास लहान मुले, वयोवृद्ध, आजारी रुग्णांना होतो. याबाबत वाहतूक पोलिसांनी वेळोवेळी सूचना केल्या, दंडही केले मात्र तरुणांना याचा कसलाही फरक पडत नाही.

त्यामुळे अशांवर कारवाई करण्यासाठी वाहतूक शाखेने वेगळीच मोहीम हाती घेतली आहे. अकोला शहरातल्या चौकाचौकात नाकाबंदी करून अशा बुलेटचे सायलेंसर जाग्यावरच काढून घेऊन त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जात आहे. या कारवाईमुळे फटाक्याचा आवाज काढून लोकांना घाबरवणाऱ्या बुलेट चालकांनाच वाहतूक पोलिसांनी आज फटाके लावल्याची चर्चा शहरात सुरू होती

# बाप्पाच्या आगमनापूर्वीच विदर्भात पावसाला सुरुवात!

**बहुतांश भागात वादळी पावसाचा इशारा, बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा**

प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**अकोला :** विदर्भात जवळपास ४० दिवसांपासून पावसाने दडी मारल्यामुळे पिकांची परिस्थिती अत्यंत दयनीय झाली आहे. शेतकरी पावसाची आतूरतेने वाट पाहत आहेत. अख्खा ऑगस्ट महिना कोरडा गेल्यानंतर सर्वांचाच धीर सुटत होता. अखेर एका दिवसावर बाप्पाचे आगमन येताच पावसाला सुरूवात झाल्याने सर्वांनीच आनंद व्यक्त केला आहे. संपूर्ण ऑगस्ट महिना कोरडा गेल्यानंतर सप्टेंबर महिन्यात हवामान कसे असेल याकडे सर्वांचे लक्ष लागले होते दरम्यान, सप्टेंबर महिन्यात बंगालच्या उपसागरात कमी दाबाची क्षेत्रे निर्माण होऊन त्यामुळे राज्यातील काही काही भागात पावसाचा जोर वाढेल, असा अंदाज हवामान अभ्यासकांनी व्यक्त केला होता. सप्टेंबर महिन्याचा पहिला आठवडा कोरडा गेल्यानंतर बंगालच्या उपसागरात तयार झालेला कमी दाबाचा पट्टा वेगाने गुजरातच्या दिशेने सरकत आहे. त्यामुळे राज्याच्या उत्तर भागात कमी दाबाच्या क्षेत्राचा सर्वाधिक प्रभाव आहे.



### आज अकोल्यासह अनेक जिल्ह्यात यलो अलर्ट

» विदर्भातील बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली आणि चंद्रपूर आदी जिल्ह्यांना रविवारी हवामान विभागाने च्यलो अलर्टज् दिला आहे. दरम्यान पुढील दोन दिवस राज्यातील काही भागात पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता हवामान अभ्यासाकांनी व्यक्त केली आहे.

शुक्रवारी सकाळी ८:३० ते शनिवारी सकाळी ८:३० या दरम्यान नंदुरबार, धुळे, जळगाव, बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा आणि गोंदिया आदी जिल्ह्यातील काही भागात पावसाचा जोर होता. दरम्यान, आज बहुतांश भागात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

# सोमवारी घराघरात मोठ्या थाटात विराजमान होणार बाप्पा

## यंदा गणपती बाप्पाचा बारा दिवस मुक्काम

प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**अकोला:** गणेशोत्सवाचे वेध लागलेल्या शहरवासीयांची गणेशमूर्ती खरेदीसाठी लगबग सुरू झाली आहे. गणेश स्थापनेला अवघा एक दिवस शिल्लक असल्याने शहरातील विविध भागांत गणेशमूर्ती विक्रीची दुकाने थाटण्यात आली आहेत. जय हिंद चौक, अकोला क्रिकेट क्लब मैदान, अशोक वाटिका जठार पेठ कौलखेड चौक गुलजारपुरा आदी परिसरात रस्त्याच्या दुतर्फा गणेशमूर्ती विक्रीचे स्टॉल सजले आहेत. विविध आकार, आकर्षक रंगसंगती आणि मनमोहक रूपातील गणेशमूर्ती भक्तांचे लक्ष वेधून घेत आहेत.



यंदा गणेशमूर्तीमध्ये विविध कलात्मक रूपे पाहायला मिळत आहेत. पद्मासनातील गणराय, बालरूपातील गणेश, सिंहासनावर विराजमान मूर्ती, हत्तीवर आरूढ गणेश यांसह विविध आकर्षक रूपातील मूर्ती विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

**कच्च्या मालाच्या दरवाढीचा परिणाम**

यंदा गणेशमूर्तींच्या किमतीत मागील वर्षाच्या तुलनेत १० ते १५ टक्के वाढ झाली आहे. कच्च्या मालाचा तुटवडा तसेच त्याच्या किमतीत झालेली वाढ यामुळे मूर्ती तयार करण्याचा खर्च वाढला आहे. त्याचा परिणाम किमतीत झाल्याचे विक्रेत्यांचे म्हणणे आहे.

**मूर्तीसोबत सजावटीचे साहित्यही उपलब्ध**

गणेशमूर्तीसोबतच गणरायाच्या सजावटीसाठी आवश्यक असलेल्या हार, फुले, मखर यासह विविध प्रकार सजावटीचे साहित्य आणि पूजेसाठी लागणारे साहित्य विक्रीसाठी ठेवण्या आले आहे. त्यामुळे गणेशभक्तांना एकाच ठिकाणी मूर्ती आणि सजावटीच साहित्य खरेदी करण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

### यंदा गणेश चतुर्थी व हरितालिका एकत्र

» विशेष म्हणजे, श्रीगणेश चतुर्थीच्याच दिवशी 'हरितालिका पूजन' असा अत्यंत दुर्मिळ आणि फलदायी योग जुळून आला आहे. हरितालिका १४ रोजी साजरी करावी. तसेच हरितालिकेचा उपवास १५ सप्टेंबरला सोडावा. हरितालिका कधी साजरी करावी याबाबत संभ्रम न ठेवता १४ रोजीच साजरी करावी.

# दुष्काळाच्या सावटात डीजेचा दणदणाट; दुष्काळात तेरावा महिना नको!

## सेवानिवृत्त एएसआय सुरेशराव तायडे यांची सोशल मीडियावरून जनजागृती; लोकप्रतिनिधींनीही गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी

प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**मूर्तिजापूर :** <मागील काही दिवसांपासून पावसाने पाठ फिरवल्याने मूर्तिजापूर तालुक्यासह परिसरातील शेतकरी दुष्काळाच्या छायेत सापडला आहे. शेतातील उभी पिके करपण्याच्या मार्गावर असून सोयाबीन, कापूस, तूर यासह विविध पिकांचे मोठे नुकसान होत आहे. अनेक कुटुंबांसमोर रोजगाराचा प्रश्न उभा ठाकला आहे. अशा गंभीर आणि चिंताजनक परिस्थितीत दुसरीकडे मात्र मोठ्या आवाजातील डीजेचा दणदणाट शहराच्या कानाकोपऱ्यात घुमत असल्याने सामाजिक जाणिवेचा प्रश्न उपस्थित झाला आहे.

गेल्या सोमवारी मूर्तिजापूर शहरात डीजेच्या कर्कश आवाजाने अक्षरशः शहर दणाणून गेले. उत्सव आणि धार्मिक कार्यक्रमांचा आनंद साजरा करताना ध्वनिप्रदूषणाच्या मर्यादांकडे दुर्लक्ष होऊ नये, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर सेवानिवृत्त एएसआय सुरेशराव तायडे यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून डीजेच्या वाढत्या आवाजाबाबत केलेली जनजागृतीपर पोस्ट सध्या चर्चेचा विषय ठरत आहे.



एवढा कर्कश आवाज आपले कान आणि मेंदू सहन करेल का?ज् असा थेट सवाल उपस्थित करत तायडे यांनी नागरिक, विशेषतः तरुणांनी या विषयाचा गांभीर्याने विचार करण्याचे आवाहन केले आहे. एखाद्या कुटुंबातील सदस्याला अतितीव्र आवाजामुळे आरोग्यविषयक त्रास किंवा इजा झाली, तर त्याचे पुढील आयुष्य कसे बदलेल? त्यातून निर्माण होणारी आर्थिक झळ संबंधित कुटुंबाला सोसणे आजच्या परिस्थितीत शक्य आहे का? असे अनेक प्रश्न त्यांनी उपस्थित केले आहेत.

**दुष्काळात तेरावा महिना नको!**

आज एकीकडे कोरड्या दुष्काळाचे सावट, दुसरीकडे कुटुंबातील रोजगाराचा प्रश्न आणि आर्थिक अडचणींचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत डीजेच्या मोठ्या आवाजात धुंद होणे म्हणजे आपण स्वतःच आपल्या अडचणींमध्ये आणखी एक भर तर घालत नाही ना, असा विचार करण्याची वेळ आली आहे.

दुष्काळात तेरावा महिनाज् ठरू नये, यासाठी तरुणांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. आनंद साजरा करणे चुकीचे नाही; मात्र तो आनंद दुसऱ्यांच्या आरोग्याला, शांततेला आणि सामाजिक वातावरणाला बाधा आणणारा ठरू नये, अशी भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

**कानांच्या आरोग्याचा प्रश्नही गंभीर**

कर्कश आणि सातत्याने होणाऱ्या मोठ्या आवाजामुळे कानांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्ती तसेच परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी यांना अशा ध्वनिप्रदूषणाचा मोठा त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे उत्सवाच्या नावाखाली ध्वनिप्रदूषण वाढविण्यापेक्षा संयम आणि सामाजिक भान जपणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

**आमदार, खासदार, मंत्र्यांनी लक्ष देण्याची मागणी**

शहरातील डीजेच्या वाढत्या आवाजाच्या प्रश्नाकडे आमदार, खासदार आणि संबंधित मंत्र्यांनी विशेष लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. प्रशासनानेही ध्वनिप्रदूषणाच्या नियमांची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. आजचा कर्कश आवाज काही क्षणांचा आनंद देऊ शकतो; मात्र त्याचे दुष्परिणाम भविष्यात एखाद्या कुटुंबाला आयुष्यभर भोगावे लागू नयेत, यासाठी वेळीच सावध होणे गरजेचे आहे. उत्सवाची परंपरा टिकवतानाच मानवी आरोग्य, सामाजिक शांतता आणि आर्थिक वास्तव यांचा विचार करण्याची वेळ आली आहे. च्डीजे बंदी केवळ प्रशासनाने लादण्यापेक्षा तरुणांनी स्वतःहून पुढाकार घेऊन ध्वनिप्रदूषणाला आळा घालावा, ज् हा संदेश सुरेशराव तायडे यांच्या सोशल मीडिया पोस्टमधून पुढे आला असून, या आवाहनाला शहरातील नागरिकांनीही सकारात्मक प्रतिसाद देण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# अकोट शहरात पावसाची हजेरी; बळीराजाच्या चेहऱ्यावर आनंद

प्रतिनिधी १३ सप्टेंबर

**अकोट :** गेल्या अनेक दिवसांपासून पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या अकोट शहर व परिसरातील शेतकऱ्यांना अखेर दिलासा मिळाला. शहरात पावसाने हजेरी लावल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला. पावसाच्या आगमनाने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव दिसून आले.

पावसाने दडी मारल्याने शेतीच्या कामांवर तसेच पिकांच्या वाढीवर परिणाम होण्याची चिंता शेतकऱ्यांना सतावत होती.

त्यामुळे पावसाची प्रतीक्षा अधिकच वाढली होती. अखेर झालेल्या पावसामुळे शेतजमिनीला ओलावा



मिळण्यास मदत होणार असून, पिकांना त्याचा काही प्रमाणात आधार मिळण्याची शक्यता आहे.

उशिरा का होईना, पावसाचे आगमन झाल्याने शेतकऱ्यांच्या अपेक्षा पुन्हा जागृत झाल्या आहेत. आगामी काळात पावसाची संततधार कायम राहावी आणि शेतीला आवश्यक पाणी मिळावे, अशी अपेक्षा बळीराजाकडून व्यक्त होत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135